
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १५८.

REFBK-0001398

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. नं. १५८

# याख्याने



REFBK-0001398

काशक—होम-रूल-लीग ऑफीस, पुणे शहर.

किंमत
स्वे आणा.

# प्रस्तावना

लो० बाळ गंगाधर टिळक यांनीं बेळगांव व नगर येथं दिलेल्या 'स्वराज्य'विषयक तीन व्याख्यानांसंबंधानें ... डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं त्यांजपासून जी जामिन घेतली होती ती मुंबई हायकोर्टानें रद्द केली हें महशूर आहे. या तीन व्याख्यानांत 'स्वराज्य' या विषयाचा उहापोह, लो० टिळक यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें, स्पष्ट व खुलासेवार केलेला असल्यामुळें, तीं व्याख्यानें सर्व लोकांना फिरून वाचावयास मिळावीं व संग्रहीं ठेवतां यावीं म्हणून या पुस्तकाच्या रूपानें छापून प्रसिद्ध केलीं आहेत. मूळ व्याख्यानें विशेष लांब असल्यामुळें त्यांचा विस्तार थोडा कमी केला आहे. तथापि सरकारी रिपोर्टरांचीच भाषा कायम ठेवली आहे. तसेंच ना. हायकोर्टानें ज्या वाक्यां-विषयीं नापसंती दर्शविली तीं वाक्येंहि काळजीपूर्वक वग-ळण्यांत आलीं आहेत.

पुणें ४८६ नारायण पेठ,<br>ता० ११।१।९१७

न. चिं. केळकर,<br>चिटणीस–स्वराज्यसंघ.

# 'स्वराज्या' वरील

# टिळकांचीं व्याख्यानें

वेळगांव येथें ता. १।५।१९१६ रोजीं दिलेलें व्याख्यान.

स्वराज्य म्हणजे काय? त्याच्यावद्दल पुष्कळांचा गैरसमज आहे. कित्येकांना ही गोष्ट कळत नाहीं. कित्येकांना ती गोष्ट कळून ते तिचा विपर्यास करतात. कित्येकांना ही गोष्ट नको असते. असे त्यांत अनेक प्रकार आहेत. तेव्हां स्वराज्य म्हणजे काय? आम्ही तें कां मागतों? त्याला आम्ही पात्र आहों कीं नाहीं? आणि आपल्याला ज्यांच्याजवळ ही स्वराज्याची मागणी करावयाची आहे त्यांच्याजवळ ती कोणत्या प्रकारानें केली पाहिजे, आपल्याला उद्योग करावयाचा तो कोणत्या दिशेनें आणि कोणत्या धोरणानें केला पाहिजे, इत्यादि गोष्टींवद्दल चार सामान्य शब्द सांगण्या पलीकडे कोणत्याहि प्रकारचें विशिष्ट विवेचन करण्याला मी आज तयार नाहीं.

हे जे सामान्य शब्द मी आपल्याला सांगणार आहें ते सामान्य शब्द केवळ माझ्याच प्रयत्नानें, माझ्याच उद्योगानें आज उपस्थित झाले आहेत असें नाहीं. स्वराज्याची कल्पना फार जुनी आहे. अर्थात् स्वराज्य

म्हटलें म्हणजे ' स्व ' च्या उलट कांहीं तरी राज्य असतें आणि त्या वेळीं ही कल्पना निघत असते हें उघड आहे. अशी स्थिति जेव्हां येते तेव्हां स्वराज्य असावें असें वाटूं लागतें आणि त्या कामाकरितां माणसें उद्योग करतात. तशा स्थितींत तुम्ही हल्लीं आहां. तुमच्यावर जे राज्य करीत आहेत ते तुमच्या धर्माचे, जातीचे, तुमच्या देशांतीलहि नाहींत. हें इंग्रज सरकारचें राज्य चांगलें कीं वाईट हा प्रश्न निराळा, स्वकीय आणि परकीय हा प्रश्न निराळा. दोहोंचा घोंटाळा पहिल्यानें करूं नका. परकीय वा स्वकीय हा प्रश्न आला म्हणजे परकीय म्हटले पाहिजे; चांगलें कां वाईट हा प्रश्न आला तर चांगलें म्हणा किंवा वाईट म्हणा. वाईट म्हटलें तर त्यांत काय सुधारणा केली पाहिजे हा प्रश्न निराळा; चांगलें म्हटलें असतां पूर्वींच्या राज्यापेक्षां त्यांत चांगल्या गोष्टी कोणत्या हें पाहिलें पाहिजे. या भिन्न भिन्न दृष्टी आहेत.

पण हल्लींची राज्यव्यवस्था अशी आहे कीं, कांहीं इंग्लंडांत शिकलेले सुशिक्षित, ज्यांना कालेजांतून चांगल्या प्रकारचें शिक्षण मिळालें आहे, अशा कर्तबगारीचे लोक हिंदुस्थानांत येऊन त्यांच्या द्वारें हिंदुस्थानांतील राज्यकारभार चाललेला असतो. बादशहा हें नांव आहे. राजा म्हणून जी कांहीं एक प्रकारची भावना तुमच्या मनांत उत्पन्न होते त्या भाव-

नेला व्यक्त स्वरूप दिलें म्हणजे हल्लींचा बादशहा होतो. ही भावना अव्यक्त आहे. या अव्यक्ताला व्यक्त स्वरूप दिलें म्हणजे राजा होतो–बादशहा होतो–पण कारभार कांहीं बादशहा पहात नाहीं. स्वराज्याचा जो प्रश्न आहे तो बादशहाबद्दलचा नव्हे आणि या अव्यक्त भावनेबद्दलचाहि नव्हे, हें पहिलें लक्षांत ठेवलें पाहिजे. कोणताहि देश असो–त्याला राजा पाहिजे, व्यवस्था करणारा कोणी तरी मनुष्य पाहिजे आणि त्यामध्यें एक प्रकारचें राज्यहि चाललें पाहिजे.

राजसत्तेचे नेहमीं दोन विभाग होतात. एक सल्लागार मंडळ आणि एक कार्यकारी मंडळ. हल्लीं हिंदुस्थानांत जो प्रश्न स्वराज्यासंबंधानें उपस्थित झालेला आहे तो या वरच्या अव्यक्त कल्पनेबद्दलचा नाहीं. आमच्यावर ज्यांनीं राज्य करावयाचें, ज्यांच्या तंत्रानें,हुकमानें, ज्यांच्या अधिष्ठानाखालीं तें राज्य चालवावयाचें त्याबद्दलचा हा प्रश्न नव्हे. इंग्रज लोकांच्याच हाताखालीं, इंग्रज राष्ट्राच्या देखरेखीखालीं, इंग्रज राष्ट्राच्या मदतीनें, त्यांच्या सहानुभूतीनें आणि त्यांच्या कळकळीनें त्यांच्या ज्या कांहीं उच्च भावना आहेत त्या भावनांच्या योगानें आम्ही आपलें कल्याण करून घ्यावें ही गोष्ट निर्विवाद आहे.

तेव्हां ही गोष्ट जर आपण गृहीत धरली, कीं इंग्रज सरकारच्या इंग्रजी राज्याच्या मदतीनें आपला भाग्योदय आप-

त्याला करून घ्यावयाचा, तर मग तुम्ही मागता काय आहांत? हा दुसरा प्रश्न उपस्थित होतो. ह्याचें उत्तर पुनः मीं आपल्या त्याला जो भेद सांगितला त्या भेदामध्येंच आहे. अव्यक्त जरी सरकार असलें तरी तें जेव्हां व्यक्त होऊं लागतें तेव्हां त्याच्या हातून त्याच्या कृतीनें त्या राज्याची व्यवस्था ठेवली जाते. हा जो व्यक्तभाव आहे हा अव्यक्त सरकारापासून निराळा आहे. कोणत्या प्रकारचा म्हणाल तर परब्रह्म जसें मायेहून निराळें आहे त्यासारखें. हे व्यक्त, अव्यक्त शब्द मी वेदान्तांतून घेतले आहेत. निर्गुण निराकार असें परब्रह्म निराळें आणि मायेच्या मोहांत यावयाला लागलें म्हणजे मग त्याला जें व्यक्त स्वरूप येतें तें निराळें. तर मग हे मायेचे जे व्यवहार आहेत ते पालटणारच. मायेचें लक्षण काय? क्षणोक्षणीं बदलणें. सरकार रहावयाचें तें एक अव्यक्त सरकार; आणि व्यक्त सरकार क्षणोक्षणीं पालटणारें आहे.

'स्वराज्य' हा जो शब्द हल्लीं निघाला आहे तो व्यक्त सरकारासंबंधानें आहे. अव्यक्त सरकार कायम ठेवून व्यक्त सरकार जें क्षणोक्षणीं बदलणारें त्यांत कोणत्या प्रकारचा बदल झाला असतां आपल्या राष्ट्राला श्रेयस्कर होईल हा प्रश्न स्वराज्याचा आहे. आणि हा स्वराज्याचा प्रश्न म्हटला म्हणजे आपल्या हिंदुस्थानांत हल्लीं ज्या तऱ्हेचा कारभार

चालला आहे, तो कोणाच्या हातांत असावा असा प्रश्न उपस्थित होतो. अव्यक्त सरकार-इंग्रज सरकार-आम्ही बदलूं इच्छित नाहीं. व्यक्त जें स्वरूप आहे तें मात्र ज्याच्या हातून हें अव्यक्त सरकार कामें करून घेत आहे त्यांच्या हातीं नसून दुसऱ्या कोणाच्या तरी हातीं यावीं असें आमचें म्हणणें आहे. ज्यांच्या हातानें हे कारभार चालले जातात त्यांपेक्षां दुसऱ्या कोणत्या तरी हातानें, दुसऱ्या कोणाच्या तरी साहाय्यानें, दुसऱ्या कोणत्या तरी व्यक्त मूर्तीनें हे केले असतां लोकांना हितकारक होईल अशा समजुतीनें हल्लीं जी स्वराज्याची चळवळ चालू आहे, ती चळवळ आज चाललेली आहे. हल्लीं हिंदुस्थानांत जी स्वराज्याची चळवळ आहे ती प्रधान मंडळी बदलण्याबद्दलची आहे.

हिंदुस्थानांत कोण राज्य करतो? बादशाहा येऊन करतात का? मोठ्या प्रसंगीं देवासारखी त्यांची मिरवणूक काढावयाची त्यांच्या ठिकाणीं आपली निष्ठा आपण प्रदर्शित करावयाची एवढेंच त्यांचें काम आहे. मग राज्यकारभार चालला आहे कोणाच्या द्वारें? हल्लीं जे नोकर आहेत त्यांच्या. स्टेटसेक्रेटरी, व्हाईसराय, गव्हर्नर आहेत; त्यांच्या हाताखालीं कलेक्टर, पाटील आहे–पोलीस शिपाई शेवटीं आपण–यांच्या द्वारें चालला आहे. एक पोलीस शिपाई बदलावा व दुसरा पोलीस शिपाई यावा असें म्हटलें तर

राजद्रोह झाला काय ? एक कलेक्टर आला हा नको, दुसरा कलेक्टर पाहिजे असें म्हटलें तर राजद्रोह झाला काय ? एक गव्हर्नर नको दुसरा गव्हर्नर आणा असें म्हटलें तर राजद्रोह झाला काय ? हा स्टेटसेक्रेटरी नको दुसरा आणा असें म्हटलें तर राजद्रोह झाला काय ? कोणीही ह्याला राजद्रोह म्हटलें नाहीं. पोलीस शिपायाला जो न्याय लागू आहे तोच स्टेटसेक्रेटरीलाही लागू आहे. स्टेटसेक्रेटरी ज्या राजाचा प्रधान आहे, ज्या राजाचा तो नोकर आहे, त्या राजाचीच आम्ही प्रजा आहोंत.

हल्लींची राज्यव्यवस्था नीट चालली असेल असें जर तुम्हाला वाटत असेल तर माझें कांहीं ह्मणणें नाहीं. हल्लीं ज्या कांग्रेसा होतात, कान्फरन्सें होतात, त्यांमध्यें तुम्ही येऊन सांगतां कीं आमचें कुळकर्णी वतन घेतलें, जंगल खात्यासंबंधीं आमच्यावर जुलूम झाला, अबकारीच्यासंबंधीं दारूचा अधिक प्रसार झाला, शिक्षणही आम्हाला ज्या तऱ्हेचें मिळालें पाहिजे त्या तऱ्हेचें मिळत नाहीं. या सगळ्यांचें मूळ काय आहे ? तुम्हाला शिक्षण कां मिळत नाहीं? अबकारी खात्याचीं दुकानें जेथें आपल्याला नको तेथें कां उघडलीं जातात ? फारेस्टमध्यें रिझर्व फारेस्ट, अमूक फारेस्ट, तमुक फारेस्ट अशा तऱ्हेचे कायदे होतात ते कां झाले ? हे सगळे प्रश्न अशा तऱ्हेचे आहेत कीं त्यांना एकच उत्तर आहे. सत्ता तुमच्या

हातांत आली असती, त्यांच्या ठिकाणीं जर तुम्ही अधि-
कारी असतां किंवा त्यांचे अधिकार लोकमताला जबाबदार
ासते तर या गोष्टी घडून आल्या नसत्या. याशिवाय याला
सरें उत्तर देतां येत नाहीं. या घडून येण्याला कारण सत्ता
ुमच्या हातांत नाहीं. तुम्ही म्हणजे ज्यांच्या कल्याणाकरितां
ही सर्व व्यवस्था करावयाची असे जे तुम्ही त्यांना या गोष्टी
ठरविण्याचा अधिकार दिलेला नाहीं.

आम्हाला कांहीं मागावयाचें असलें म्हणजे तें लहान
ोरासारखें होतें. भूक लागली म्हणजे तें रडतें, त्याला
ांगतां येत नाहीं कीं भूक लागली. मग आईनें ओळखा-
वयाचें भूक लागली असेल किंवा त्याच्या पोटांत दुखत
ासेल. कित्येक वेळेला उपचार होतात ते केवळ अना-
ार्थी होतात. तशी आपली आज सध्यां स्थिति झालेली
ाहे. तुम्हाला काय पाहिजे, कोठें आडतें आहे हें पहि-
ल्यानें तुम्हाला मुळींच कळत नाहीं. ते कळूं लागलें तेव्हां
तोंडानें तुम्ही बोलूं लागला. परंतु तुमच्या बोलाप्रमाणें कर-
वून घेण्याची शक्ति तुमच्या हातामध्यें नाहीं. अशी स्थिति
ासल्यामुळें हल्लीं काय झालेलें आहे—जें काय करावयाचें,
काय तुम्हाला पाहिजे—घरामध्यें विहीर खणावयाला
ले तरी सुद्धां कलेक्टर साहेबाकडे अर्ज करा. रानांतील
घ मारावयाला पाहिजे कलेक्टरसाहेबाकडे करा अर्ज, गवत

मिळत नाहीं, जंगलांतील भारा मिळत नाहीं, गवत तोडण्याची परवानगी पाहिजे, करा कलेक्टरसाहेबाकडे अर्ज. म्हणजे हे सर्व दुबळ्यासारखें झालेलें आहे. ही व्यवस्था आम्हाला नको आहे, यापेक्षां कांहीं तरी चांगली व्यवस्था पाहिजे तें स्वराज्य. तें होमरूल.

पहिल्या पहिल्यानें हे प्रश्न निघत नाहींत. ज्याप्रमाणें मुलगा ल्हान असला म्हणजे त्याला कांहीं कळत नाहीं, मोठा झाला म्हणजे या गोष्टी कळूं लागतात. मग त्याला असें वाटूं लागतें कीं आपल्या घरांतील व्यवस्था कांहीं तरी आपल्या मताप्रमाणें झाली तर चांगली. तसेंच राष्ट्राचें. ही व्यवस्था, हा राज्यकारभार करणारे लोक विलायतेहून कांहीं एक प्रकारच्या नियमानें व कायद्यानें नेमले जातात, आणि त्यांचें धोरण कोणत्या प्रकारचें असावें याबद्दल त्या त्या कायद्याच्या मर्यादेंत नियम केलेले असतात. हे नियम चांगले असतील किंवा वाईट असतील. चांगले असतील, मोठे अगदीं सुयंत्रित असतील, व्यवस्थित असतील, नाहीं असें मी म्हणत नाहीं. पण लोकांच्या हातची व्यवस्था कितीही चांगली असली तरी ज्याला ही व्यवस्था करण्याचा अधिकार पाहिजे असतो त्याला नेहमीं हें पसंत असतें असें नाहीं. स्वराज्याचें हें तत्त्व आहे.

तुम्हाला आपला कलेक्टर निवडण्याचे अधिकार मिळाले तर ती कलेक्टर हल्लींच्या कलेक्टरापेक्षां कांहीं अधिकच काम करील असें सांगतां येत नाहीं. करणार नाहीं कदाचित; वाईटहि करील. मला कबूल आहे. पण यांच्या आणि त्यांच्यामध्यें भेद असा होतो कीं हा आम्हीं निवडलेला असतो, आमचा मनुष्य असतो, आम्ही ज्या दिशेनें संतुष्ट राहूं इकडे तो पहात असतो. व जो दुसरा असतो त्याला असें वाटतें कीं आमच्या बुद्धीला जें चांगलें तें इतरांना चांगलें वाटलेंच पाहिजे. लोकांचें काय ऐकावयाचें? मी इतका शिकलेला, मला इतका पगार मिळतो, माझ्या ठायीं इतकी कर्तबगारी आहे, मी जें करीन तें लोकांचें अकल्याण काय म्हणून करीन? उत्तर एवढेंच कीं अशी घमेंड आहे म्हणून. ज्याच्या पोटाला चिमटा बसतो त्याला त्याचा अनुभव नाहीं. एवढेंच त्याला कारण, दुसरें कांहीं कारण नाहीं.

तेव्हां आपल्याकडे ज्या ज्या कांहीं तक्रारी उपस्थित झालेल्या आहेत त्याचें सूक्ष्मरीतीनें विवेचन कराल तर हल्लींची जी पद्धती आहे ती पद्धती आम्हाला नको आहे. राजा नको आहे असें नाहीं; इंग्रज सरकार नको आहे असें नाहीं; बादशहा नको आहे असें नाहीं. ज्या पद्धतीमुळें ही राज्यव्यवस्था चाललेली आहे तींत एक प्रकारचा विशिष्ट फरक आम्हाला पाहिजे आहे. आणि तो

फरक केला असतांना इंग्रजी राज्याला कांहीं धोका येईल असें त्यांत मला तरी कांहीं दिसत नाहीं. त्या राजपद्धतींत कोणता फरक केला पाहिजे या गोष्टीकडे आतां पुष्कळ लोकांचीं मनें लागलीं आहेत माझ्या घरच्या व्यवस्थेचा अधिकार जेव्हां मी मागतों तेव्हां असें म्हणत नाहीं कीं तुमची जी प्राप्ती असेल ती मला द्या आणि खर्च करूं नका. खर्च आम्हालाच करावयाचा, पैसे ही गोळा करावयाचे. ही जी एक प्रकारची संयुक्त--जबाबदारी आहे ती आम्हाला पाहिजे आहे. मग आम्हाला काय करावयाचें तें पाहूं. हल्लीं असा तंटा आहे. जे ब्यूराक्रसीचे लोक येतात, अधिकारी वर्गाचे लोक येतात, ते म्हणतात आमच्या मर्जीप्रमाणें करा. आम्ही म्हणतों आमच्या मर्जीप्रमाणें करा, म्हणजे दु:खांचें निरसन होईल. न

मुलगा अज्ञानी असला म्हणजे बाप मरतांना पंच नेमतो। तो पंच नेमला म्हणजे तो पंच सगळ्या इस्टेटीची देखरेख करीत असतो. त्यांत याचा कांहीं फायदाही होत असतो, नाहीं असें नाहीं. मग हा मुलगा थोडासा मोठा होऊं लागला, म्हणजे त्याला दिसतें कीं ह्याच्यामध्यें कांहीं गैरशिस्त आहे मला व्यवस्था करण्याचा हक्क संपादन करावयाला पाहिजे म्हणजे मी यांपेक्षां बरी व्यवस्था ठेवीन. त्याला वाटतें तसा असतो. तशी तो ठेवतोच असें नाहीं. कदाचि

उथळा असला तर बापाचे पैसे उडवून टाकतो. पण असें झालेला वाटूं लागतें. आणखी या दोघांमध्यें विरोध येऊं नये म्हणून कायद्यानें अशी मर्यादा करण्यांत येतें कीं २१ वर्षे झालीं म्हणजे ट्रस्टीनें आपली देखरेख पुरी करून ती मुला-च्या ताब्यांत दिली जावी: ही जी व्यवहारांतील गोष्ट तींच राष्ट्राला लागू आहे. राष्ट्रांतील लोक सुशिक्षित झाले, त्यांना आपले व्यवहार कसे करावे हें कळूं लागलें म्हणजे त्यांच्याकरितां म्हणून जे व्यवहार इतर लोक करीत असतात ते आपल्या हातांत यावे अशी इच्छा होणें अगदीं स्वाभा-विक आहे. पण या इतिहासामध्यें किंवा राजकारणामध्यें मौज अशी आहे कीं हा जो २१ वर्षांचा कायदा आहे तो राजकारणांत नाहीं. शंभर वर्षे तुम्ही एखाद्या राष्ट्राला शिक्षण दिलें, आतां त्याचा कारभार त्याच्या हातांमध्यें द्या, असें सांगणारा कायदा कोणत्याही प्रकारें यदाकदाचित् कल्पिला तरी त्याची अंमलबजावणी होणें कांहीं शक्य नाहीं. ही अंमलबजावणी करून घेणें म्हणजे लोकांनींच करून घेत-ली पाहिजे. त्यांचा हक्क आहे. तेव्हां अशी कांहीं व्यवस्था आपल्याकडे पाहिजे. पूर्वी अशी कांहीं थोडीशी व्यवस्था होती. तशी व्यवस्था हल्लीं नाहीं. आणखी ह्या सर्व आप-ल्या मागण्यांचें, आपल्याला जीं दुःखें होतात, आपल्याला ज्या कांहीं उणिवा आहेत, राज्यकारभारांत आपल्याला ज्या

कांहीं गैरसोयी नजरेस येतात, त्या सर्वांचें मूळ यांमध्यें आहे. आणि अशा तऱ्हेनें त्या मुळाची चौकशी करून त्याच्यावर जो उपाय योजिलेला आहे त्याला होमरूल असें म्हणतात. त्याचें नांव स्वराज्य. **थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्यासंबंधींची जी व्यवस्था ती आपल्या हातांत असावी, अशी जी मागणी ती स्वराज्याची मागणी.**

लोकांच्या हातांत अधिकार देणें हें राज्यकारभाराचें उत्कृष्ट तत्त्व आहे. याबद्दल कोणी वाद करीत नाहीं. कारण, जे येथें अधिकारी आहेत त्यांच्या देशांत तोच प्रकार चालू आहे. तेथें गेलें असतांना त्यांना तेंच तत्त्व प्रतिपादन करावें लागतें. तेव्हां इतिहासाचें हें तत्त्व वाईट आहे असें कोणी सांगत नाहीं. मग वाईट काय आहे? हिंदी लोक स्वराज्याला आज पात्र झाले नाहींत, असें स्पष्ट सांगतात. आणि आमच्यापैकीं कांहीं अशी मंडळी आहेत कीं—पंचतंत्रामध्यें त्रयाणां धूर्तानाम् गोष्ट आहे त्यासारखी आहेत. ती गोष्ट अशी. एक खेडेगांवचा मनुष्य एक मेंढरूं डोक्यावर घेऊन आला होता. एक धूर्त त्याला म्हणाला तुझ्या डोक्यावर शेळी आहे. दुसरा म्हणाला तुझ्या डोक्यावर कुत्रा आहे. तिसऱ्यानें तिसरेंच सांगितलें. त्यानें मेंढरूं टाकून दिलें. त्यांनीं मेंढरूं नेलें. तशासारखी आमची स्थिति आहे.

मनुष्यस्वाभावाची गोष्ट आहे; तशीच आमच्यांत कांहीं मंडळी आहेत.

आम्ही पात्र कां नाहीं ? आमच्यांत पात्रता आणली गेली नाहीं ? आम्ही केलेले वाही ? आमच्या आईबापांनीं केलेलें नाहीं ? आम्ही पात्र कां नाहीं ? कां आम्हाला नाक नाहीं ? डोळे नाहींत ? कान नाहींत ? बुद्धि नाहीं ? लिहितां येत नाहीं ? ग्रंथ वाचलेले नाहींत ? घोड्यावर बसतां येत नाहीं ? कां नाहीं आम्ही पात्र ? शेक्सपीअरच्या एका नाटकांत, एका ज्यूनें विचारलेल्या प्रश्नासारखे मी आपल्याला विचारतों. नाहीं काय आम्हाला ? ' तुम्ही काम केलें नाहीं. ' दिलेंच नाहीं तर केव्हां करणार आम्ही ? देऊन केलें नाहीं अशी कधीं गोष्ट झाली होती काय ? विलायतेहून कोरा करकरीत २१ वर्षांचा मनुष्य तुम्ही आणतां. त्याला काय करतां येतें ? त्याला कोठें अनुभव असतो ? तो एकदम येतो तो येथें असिस्टंट कलेक्टर होतो व ६० वर्षांचा मामलेदार असला तरी त्याच्यावर हाच २१ वर्षांचा अ० कलेक्टर. ६० वर्षांचा अनुभव फुकट ? २१ वर्षांचा मनुष्य येतो तो तुम्हाला सांगावयाला लागतो, या ६० वर्षांच्या मामलेदाराला बहुतकरून तो आपल्यापुढें उभा करतो. बसावयाला खुर्चीही देत नाहीं. आणि हा बिचारा १५०।२००।४०० रुपये मिळवावयाचे अस-

तात म्हणून त्याच्यापुढें हात जोडून उभा असतो. (टाळ्या) मग या मामलेदाराला अनुभव मिळावयाचा कसा? हा पात्र व्हावयाचा कसा ? आणि हें गाडें चालावयाचें कसें? याचा कोणीं विचार केला आहे का ?

हिंदुस्थानांतील लोक स्वराज्याला पात्र नाहींत, त्यांच्या हातून आपल्या राज्याचा बंदोबस्त नीट ठेवतां येणार नाहीं अशी जर हीच गोष्ट खरी असती तर या देशामध्यें प्राचीन काळीं हिंदु व मुसलमान यांनीं कधींही राज्यें केलीं नसतीं. या देशांत पूर्वीं आपलीं राज्यें होतीं. व्यवस्था लावणारे पुरुष होते. ह्याचा पुरावा एवढाच घ्यावयाचा कीं इंग्रज सरकार या देशांत येण्यापूर्वीं कांहीं तरी व्यवस्था होती, सर्वत्र अंदाधुंदी नव्हती. एक मनुष्य दुसऱ्याला कांहीं मारीत नव्हता. अशी जर व्यवस्था होती तर ह्याला पात्र नाहीं असें कसें म्हणावयाचें ? हल्लींच्या काळीं शास्त्राची प्रगति झालेली आहे, माहिती वाटलेली आहे, अनुभवाचा एके ठिकाणीं संग्रह झालेला आहे. तेव्हां पूर्वींच्या पेक्षा अधिक मोकळीक आम्हांला पाहिजे आहे. आणि आम्ही अधिक पात्र व्हावयाला पाहिजे. किती दिवस शिकविणार? १ पिढी २ पिढ्या कां ३ पिढ्या! कांहीं मर्यादा घाला.

तुम्ही आम्हाला शिकवायाला आला. ज्यावेळीं, शिक्षक घरामध्यें मुलाकरितां आम्ही नेमतों त्या वेळीं, किती दिवसांत शिकविशील १० वर्षांत, २० वर्षांत का २५ वर्षांत असा प्रश्न त्याला विचारतो. दोन महिन्यांत, चार महिन्यांत; पण जर आमच्या अदमासाबाहेर सांगितलें कीं, या मुलाचा जितका अभ्यास सहा महिन्यांत व्हावा तो वर्षांत होईल असें सांगितलें, तर त्याला आम्हीं सांगतो तूं कुचकामाचा आहेस, जा. आम्ही दुसरा शिक्षक नेमूं. तेव्हां अशा तऱ्हेनें लोकांवर—सर्व लोकांवर—ज्या लोकांचें शिक्षण ह्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांत आहे, ज्यांना सुधारणें हें ह्या अधिकाऱ्यांचें कर्तव्य आहे तें कर्तव्य करण्याचें एका बाजूला राहिलें. प्रयत्न करीत असतात दुसऱ्या बाजूला. म्हैसूरमध्यें व्यवस्था काय अडली आहे ? कोण कामें करीत आहेत ? म्हैसूरचा राजा हिंदु, प्रधान हिंदु, प्रजा हिंदु, खालचे अमलदार हिंदु. म्हैसूर एवढें राज्य चालवितें तर म्हैसूरच्या पलीकडील दोन जिल्ह्यांतील लोकांना म्हणतात असें चालवितां यावयाचें नाहीं.

मी असें विचारतों कीं, बादशाहाला सिव्हिल सर्वंटानें कारभार चालविला काय, आणखी आमच्या वेळची साहेबांनीं चालविला काय ? बादशहाचें कांहीं नुकसान आहे कां याच्यांत ? तें राज्य कायमचें आहे, तो बादशहा कायमच आहे. फरक काय होणार कीं, त्याच्यापाशीं एक

गोरा नोकर होता तो काळा होणार. मग हा विरोध कोणाकडून येतो ? तर अधिकारारूढ जे लोक झाले आहेत त्यांच्याकडून हा विरोध होत असतो. हा बादशहाकडून विरोध होत नाहीं. यांत कांहीं बादशहाच्या दृष्टीनें अराजकत्व आहे, राजनिष्ठा नाहीं असें होत नाहीं. राजद्रोह होत नाहीं. राजद्रोह म्हणजे काय ? राजाचा द्रोह. राजा म्हणजे काय पोलीस शिपाई ? मघाशी मीं सांगितले कीं, हा भेद पहिल्यानें केला पाहिजे. मग उद्यां तुम्ही म्हणाला कीं पोलीसच्या शिपायाला काढा तर झाला कां राजद्रोह ? पोलीस शिपायांची आपली तशी समजूत आहे ! तसेंच जरा वर चढा म्हणजे आपल्याला कळून येईल कीं, जी कांहीं आपण मागणी करीत आहों ती बरोबर आहे, योग्य आहे, न्याय्य आहे, मनुष्यस्वभावाला अनुसरून आहे. इतर राष्ट्रांनीं तेंच केलें आहे.

माझ्या समजुतीनें आम्ही स्वराज्याला पात्र आहोंत. आतां आम्ही काय मिळवूं इच्छितों आणि काय आपण मागावें हे मी आपल्याला थोडक्यांत सांगणार आहें व माझें भाषण पुरें करणार आहें. हिंदुस्थानचा राज्यकारभार कसा आहे हें आपल्याला माहीत आहे. पण सांगावयाची गोष्ट अशी कीं, तो विशिष्ट कायद्याप्रमाणें होत असतो. त्याचे नियम ठरलेले आहेत. स्टेट सेक्रेटरीचे अधिकार काय, गव्हर्नर जन-

रलाचे अधिकार काय, त्यांत पद्धतीचें तीन मोठे भाग आहेत. विलायतेंत स्टेट सेक्रेटरी साहेब आहेत. हिंदुस्थानांत दिल्लीला गव्हर्नर जनरल आहे. याखालीं इलाख्यापर्यंत एक गव्हर्नर आहे. ह्याच्या खालचे तूर्त सोडून देऊं. पण मोठी व्यवस्था म्हणजे ही तीन प्रकारची आहे ती ह्या रीतीची. आतां पुढें प्रत्येकीं विचार करावयाला लागलों तर स्टेट सेक्रेटरी नेमतो कोण ? आम्ही नाहीं. ही जी रचना केली आहे, ती कंपनी सरकारच्या धोरणावर केली आहे. ईस्ट इंडिया कंपनीकडे जेव्हां ह्या देशांत राज्य होतें तेव्हां व्यापारी तत्त्वावर सर्व व्यवहार चालला होता. कंपनीच्या भागीदारांना पुष्कळसा नफा कसा मिळेल इकडे सगळें लक्ष असे. आणि कंपनीचे जे डायरेक्टर होते ते हल्लींच्या स्टेट सेक्रेटरीच्या जागीं होते. सगळें राज्य चालविण्याचा हा एक मक्ता दिलेला होता म्हणांना ? डायरेक्टर गेला त्यांच्या ठिकाणीं स्टेट सेक्रेटरी आला; हिंदुस्थानांत किती पैसा खर्च करावयाचा, कोणते कर बसवावयाचे, हें ठरवावयाचें कोणी ? तर स्टेट सेक्रेटरीनें. हा मुख्य अधिकारी. ह्याच्या हाताखालचे गव्हर्नर हा नोकर. आणि त्याच्या हाताखालीं दुसरे नोकर. आणि एकंदर सर्व राज्यकारभार या स्टेट सेक्रेटरीच्या संमतीनें, ह्याच्या विचारानें, ह्याच्या सल्ल्यानें चालला पाहिजे असें हल्लींचें धोरण आहे. जरी राणीसरकाराकडे राज्यकारभार गेला, त्यांनीं मोठा जाही-

रनामा काढला, तरी त्या जाहीरनाम्याच्या धोरणावर मात्र राजधोरण नाहीं. राजधोरण व्यापारी कंपनीच्या धोरणावर. राज्याची व्यवस्था कंपनीच्या धोरणावर, आणि जाहीर-नामा मधल्यामध्यें फुकट.

मग हीं कायदेकाउन्सिलें निघालीं. हळूं हळूं म्युनिसि-पालिटींत तुमचे कामगार झाले. कायदेकाउन्सिलांत झाले. तरी अखेरच्या किल्ल्या अजून त्यांच्याच ताब्यांत आहेत. कायदेकाउन्सिलांत वादविवाद करावा. वादविवाद करण्याला तुम्हाला पूर्ण मोकळीक आहे. हे पैसे इकडे खर्च करा याबद्दल वादविवाद करा. करावयाचे कीं नाहीं तें आम्ही ठरवूं. तुमच्या तोंडाला, तुमच्या मनाला वाटेल तेवढे श्रम द्या, आमची कांहीं हरकत नाहीं. रात्रभर जागा, आपली भाषणें तयार करा; वर्तमानपत्रांत छापण्याऐवजीं मुंबईच्या ग्याझे-टींत प्रसिद्ध करूं. एवढाच काय तो फरक. यामध्यें कांहीं मिळालें नाहीं. मिळण्याची आशा दाखविली आहे, आम्हांला गेल्या पांच पन्नास वर्षांमध्यें स्टेट सेक्रेटरी, गव्हर्नर जनरल ह्यांनीं सुद्धां असें चाळवीत ठेवलें आहे. तरंगत ठेवलें आहे—जराशी तुम्ही गडबड करावयाला लागला कीं "पांच मेंबर होते तें आम्ही उद्यां सहा करणार." पांचाचे सहा करून आम्हांला काय फायदा ? उगीच आमच्या-पैकीं एखाद्या मनुष्याला चार दिवस फुकट तेथें रखडावयाला

लावावयाचें यापेक्षां कांहीं फायदा नाहीं त्याच्यांत. " सहाला तुम्ही तक्रार केली, आठ करतो." अशा तऱ्हेनें याचा कांहीं निकाल लागावयाचा नाहीं, अशी लोकांची खात्री होऊन चुकली आहे.

तुम्हाला जे कांहीं हक्क द्यावयाचे असतील ते तोडून द्या आम्हाला. तुमचे अधिकार कितीही मोठे असोत. ही पद्धति मात्र आम्हाला नको आहे. इंग्रज सरकार पाहिजे आहे. या राजछत्राखालीं आम्हाला रहावयाचें आहे. पण ह्या स्टेट सेक्रेटरी म्हणून जो जांवई उत्पन्न केला आहे, तो जांवई आम्हाला नको. ह्याच्या निदान सल्लागार मंडळांत आमचे लोक पाहिजे आहेत आम्ही निवडलेले. ही पहिली सुधारणा झाली पाहिजे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानचा खर्च कोण करणार, पैसा किती गोळा करणार, कर किती बसविणार हें आमच्या मतानें ठरलें पाहिजे. आम्ही म्हणतो ते कर नसावयाला पाहिजेत. ते म्हणतील खर्च कसा चालेल ? ते पुढें आम्ही पाहूं. आम्हाला इतकें कळतें कीं जितके पैसे असतील त्या मानानें खर्च करावा लागतो किंवा जितका खर्च होईल त्या मानानें पैसे वसूल करावे लागतात. हें आम्हाला समजतें.

होमरूलचें दुसरें तत्त्व असें आहे कीं, हे अधिकार लोकांच्या हातांत पाहिजेत. चांगल्या माणसांच्या अर्थात्

लोकांनीं निवडून दिलेल्या लोकांच्या हातांत पाहिजेत. राज्य बुडेल, राज्य जाईल, हे विचार मुळीं बाहेरचे आहेत. आमच्या मर्यादेंत आमच्या टप्यांत आमच्या नजरेंत येत नाहींत. आणि हें पण आम्ही इच्छित नाहीं. पुन्हा असें सांगतों कीं जर राष्ट्राला सुख व्हावयाला पाहिजे, हजारों आज ज्या तक्रारी उपस्थित झालेल्या आहेत, त्या जर काढून टाकावयाच्या असतील, तर पहिल्यानें ही राजपद्धति बदला. मराठीमध्यें एक म्हण आहे. "घोडा कशानें अडला, विड्याचीं पानें कशानें सडलीं ? भाकरी कशानें जळली ?" त्याला उत्तर एक. "न फिरविल्यामुळें." पानें चाळावयाला पाहिजे होतीं. भाकरी फिरवावयाला पाहिजे होती. घोडा फिरविला असता तर तो अडला नसता. आमच्या जंगलच्या तक्रारी काय, अबकारींच्या तक्रारी काय–कुळकर्णी वतनाच्या तक्रारी काय–सत्ता आमच्या ताब्यांत नाहीं म्हणून. ह्याचें थोडेंसें भाषांतर केलें तर स्वराज्य नाहीं म्हणून. स्वराज्य आम्हाला असणें हें मूळ त्याच्यांत आहे.

स्वराज्याची मागणी म्हणजे अशी आहे कीं, तांत राजद्रोहाचा संबंध नाहीं. बादशहाचा संबंध नाहीं. अव्यक्त सरकारचाही पण संबंध नाहीं. ही जी कांहीं घरची व्यवस्था आहे ती तुमची तुम्हींच करावी; आणि असें केलें असतां काय होईल ? एक तर मनें तुमचीं शांत

राहतील. तुम्हांला काय करावयाचें तें आपल्या हिताकरित आपण करीत आहोंत अशा बुद्धीनें कराल; इतकेंच नव्हे, पण खर्चही आपण कमी कराल. मला वाटत नाहीं कीं कोणत्याही नेटिव्ह संस्थानांत कलेक्टराला पंचवीसशें रुपये पगार आहे. जगामध्यें कलेक्टराचें काम करणाऱ्या मनुष्याला अधिकांत जर अधिक कोठें पगार असेल तर तो हिंदुस्थानामध्यें आहे. ( टाळ्या ) पूर्वींच्या राज्यांत एका कलेक्टराला २५०० रुपये पगार म्हणजे सरासरी ३०००० ची वर्षांची जहागिरी होते. ती आपण आपल्या स्वराज्यांत ३०००० ची जहागिरी कधीं काढून दिली आहे कां ? तें काम आम्हांला कमी पगारांत करतां येईल. मनुष्यें मिळतात, मग कां त्याला एवढा पगार ? आम्हांला जरूर नाहीं. शिक्षणाकडे आज पैसे आपल्याला मिळत नाहींत असें वाटतें. लोकोपयोगी कामें करण्याकरितां पैसे नाहींत, ही सबब पुढें येते, ती प्रथम नाहींशीं होईल. व्यवहार इतकाच सुरळीत चालेल. आरंभीं नाहीं सुरळीत चालणार. यदाकदाचित् एक आणा रुपयांत कमी चालेल. तरी तो व्यवहार आपल्या लोकांनीं चालविला आहे आणि तो लोकांच्या अनुमतीनें, ह्यामुळें जें कांहीं चीज होईल त्याची किंमत अधिक आहे.

अशा तऱ्हेनें ह्याच्यामध्यें चांगली व्यवस्था मागावयाची आहे. हल्लीं जो कायदा आहे त्यामध्यें दुरुस्ती करून घ्यावयाची आहे; व ती पार्लमेंटकडून करून घ्यावयाची आहे. इंग्रज लोकांना, इंग्रज पार्लमेंटाला अर्ज करावयाचा, त्यांच्या पुढें ही स्थिति मांडावयाची, याकरितां जें कांहीं करावयास लागेल तें करावयाचें, असा जर उद्योग तुम्ही आतां ५। २५ वर्षें चालविला तर ह्याचें फळ आल्याखेरीज केव्हांही रहावयाचें नाहीं. त्यांतून आतां जी लढाई चालू आहे त्या लढाईमुळें आतां अशी वेळ आली आहे कीं हिंदुस्थानची किंमत, हिंदुस्थानचें शौर्य, हिंदुस्थानचें धैर्य आणि स्थैर्य ज्या तऱ्हेनें वाढेल असा कांहीं तरी उद्योग करणें प्राप्त आहे. हा उद्योग ते ( आपण ) करीत असतात ही गोष्ट जर सरकारच्या नजरेस आली तर आपली मागणी लवकर सफल होण्याची आशा आहे. याकरितां हा विषय मुद्दाम मीं आपल्यापुढें घेतलेला आहे. दुसरीकडेही या विषयाची चर्चा चालू आहे. आम्हीं याकरितां जो संघ स्थापिला आहे तो असा आहे कीं, या उद्योगाला आजच नव्हे तर पुढें कांहीं दिवसांनीं प्रत्येक ठिकाणीं मला किंवा दुसऱ्या कोणाला विषय मांडण्याचा प्रसंग येईल. हा जो विषय आहे, हा आपल्या चर्चेमध्यें ठेवून त्याची नित्य चर्चा करा. त्याचें नित्य ध्यान करा, त्याचा उप-

योग काय आहे हें समजून घ्या, त्यांत राजनिष्ठपणा किती, अराजनिष्ठपणा किती, ह्याची नीट मीमांसा करून ठेवा असें आजच्या प्रसंगीं माझें आपल्याला सांगणें आहे.

माझें जें कांहीं म्हणणें आहे तें जरी यापेक्षां पुष्कळ अधिक असलें तरी त्यांतील मथितार्थ काय आहे तो मी थोडक्यांत आपल्याला सांगितला आहे, ह्याचा विचार आपल्याकडे सुरू झाला, महाराष्ट्रांत सुरू झाला, हिंदुस्थानांत सुरू झाला तर केव्हांना केव्हां तरी या उद्योगाला यश येणार. आणि ही परमेश्वराच्या हातची गोष्ट असली तरी ती अवश्य आहे. आमच्या हातची नाहीं हें मी कबूल करतों. पण कर्माचा परिणाम होणें हें जगांत कांहीं चुकत नाहीं. कर्माला फल केव्हांना केव्हां तरी—मी म्हणतो इतक्या लवकर मिळणार नाहीं, माझ्या डोळ्यादेखत मिळणार नाहीं, कदाचित मला त्यापासून फायदा व्हावयाचा नाहीं—परंतु या कर्माचें फळ हें झालेंच पाहिजे. ( टाळ्या ) मग कर्माच्या कायद्या-प्रमाणें अमूक कर्म केलें त्याच्यापासून दुसरें उत्पन्न होतें, त्याच्यापासून तिसरें उत्पन्न होतें अशी ही परंपरा चालते. वेळ लागेल, उशीर लागेल, परंतु आम्हाला मोक्ष हा आमच्या डोळ्यादेखत व्हावा म्हणून तरी कोठें मागतो? अमुक पुरुषाच्या हातून व्हावा अशा बुद्धीनें तरी कोठें मागतो ? आतांच आपल्या परिषदेमध्यें ठराव पास झाला.

माडरेट्स आणि न्याशन्यालिस्ट हे पक्ष नकोत. म्हणजे कोणालाहि स्वराज्य देणें आम्हाला सारखेंच आहे. हें आपलें काम आहे, अशा बुद्धीनें या उद्योगाला प्रवृत्त व्हा. माझी खात्री आहे कीं, परमेश्वरकृपेनें या उद्योगाचें फळ तुमच्या डोळ्यांदेखत नाहीं तरी तुमच्या पुढील पिढीला मिळाल्याखेरीज राहणार नाहीं.

१३ए८

# व्याख्यान २ रें.

अहमदनगर येथें ता. ३०।५।१९१६ रोजीं दिलेलें व्याख्यान.

ज्याबद्दल हल्लीं चोहोंकडे चर्चा होत आहे अशा विषया-संबंधानें मी आज दोन शब्द आपल्याला सांगणार आहे. हा विषय म्हटला म्हणजे स्वराज्य हा होय! ज्या कांहीं आपल्या घरच्या गोष्टी आहेत त्या आपल्या घरीं आपण सत्तेनें करतों. मला अमुक गोष्ट करावीशी वाटली, जर ती केवळ खासगी असली तर त्याबद्दल कोणास विचारावें लागत नाहीं, कोणाची परवानगी घ्यावी लागत नाहीं किंवा दुसऱ्या कोणाचा सल्ला आपल्याला घेण्याची जरूरी नाहीं. सार्वजनिक बाबतींत तशी स्थिति नाहीं. ज्याप्रमाणें स्वतःचें कल्याण त्याच प्रमाणें सर्व लोकांचें कल्याण. लोक चांगल्या रीतीनें नांदण्यास कसे लागतील, त्यांना अधिकाधिक सुस्थिति कशी प्राप्त होईल, यासंबंधीं विचार केला तर आपल्या ध्यानांत असें येईल कीं कोणत्याही गोष्टी घेतल्या तरी त्या आपल्या हातांत सत्ता नसल्यामुळें आडतें. आज ५। ५० वर्षें हिंदुस्थानांतील पुष्कळ शहाण्या लोकांनीं या गोष्टींचा विचार करून त्याचें एक कारण शोधून काढलें आहे तें हें कीं, आमच्या लोकांच्या हातांत सत्ता नाहीं.

सार्वजनिक बाबतींत पुष्कळ लोकांचे पुष्कळ अभिप्राय आहेत. कोणी म्हणतात तुमचे हातांत सत्ता कां नाहीं? तुम्ही दारू पीऊं नका म्हणजे झालें. उपदेश गोड दिसतो खरा. पण सर्व लोकांना बंदी करणें हें काम नुसत्या उपदेशाचें नाहीं. याला कांहीं सत्ता लागत असते; ती सत्ता ज्यांचे हातांत नाहीं त्याला तें काम करतां येत नाहीं. आणि अशा नुसत्या उपदेशानें काम होण्याजोगें असतें तर राजाची आम्हाला जरूर पडली नसती. पुष्कळ लोकांचे मनांत ज्या गोष्टी येतात त्या गोष्टींचा अंमल व्हावा, त्या गोष्टी अमलांत याव्यात याकरितां राज्यव्यवस्था निर्माण झालेली आहे आणि ती राज्यव्यवस्था आपल्या हातांत नसल्यानें जर तुमच्यापैकीं हजारो लोकांना, एकादी गोष्ट इष्ट वाटली आणि ज्यांच्या हातांत राज्यव्यवस्था आहे त्यांना ती गोष्ट इष्ट वाटली नाहीं तर त्या गोष्टी कधींही अमलांत यावयाच्या नाहींत.

पहिल्या पहिल्यांदा आमची समजूत अशी होती कीं, बोलून चालून इंग्रज सरकार परकीय आहे, त्यांना परकीय म्हणण्यांत राजद्रोह नाहीं. तर परकीय ज्या गोष्टी आहेत त्या सांगणें यांत कांहीं राजद्रोह नाहीं, कोणत्याही प्रकारचा गुन्हा नाहीं. परकीयपणानें होतें काय? परकीय व आपल्यामध्यें भेद काय होतो? तर परकीयांची दृष्टि परकीय असते. परकीयांचे विचार परकीय असतात आणि परकीयांची

एकंदर वागणूक अशा तऱ्हेची असते कीं, ज्यांना ते परकीय आहेत त्या लोकांचें कल्याण विशेष करण्याकडे त्यांचे बुद्धीची प्रवृत्ती होत नाहीं. या देशांत राहणाऱ्या लोकांचें जेणेंकरून हित होईल, असें जो करितो तो मनुष्य–मग मुसलमान असो, इंग्रज असला तरी हरकत नाहीं–परकी नाहीं. परकीयपणा हिताहिताच्या संबंधांत आहे. परकीयपणा गोऱ्या आणि काळ्या कातडींत खचीत नाहीं. परकीयपणा धर्मांत नाहीं. परकीयपणा व्यापारधंद्यांत नाहीं. ज्या देशांत आपण रहावयाचें त्या देशांतील लोकांचेमध्यें आपलीं मुलें बाळें रहावयाचीं, ज्या देशांत आपली पुढली पीढी राहणार त्यांना चांगले दिवस येतील, त्यांचें कल्याण होईल, त्यांचें हित होईल अशी व्यवस्था जो मनुष्य करूं इच्छितो तो मनुष्य मी परका समजत नाहीं.

आम्ही पहिल्यांदा असें समजत होतों कीं, ह्या सरकाराला कळविलें म्हणजे आमच्यासारखें सरकार ताबडतोब करावयाला लागेल. परकीय सरकार आहे. त्यांना कळत नाहीं. त्यांना आमच्या १०।५ प्रमूख लोकांनी एके ठिकाणीं जमून सांगितलें म्हणजे त्या लोकांच्या ही गोष्ट लक्षांत येईल. ते परकीय असल्यामुळें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. आम्हीं कळविलें म्हणजे ते इतके उदार बुद्धीचे आहेत, शहाणे आहेत कीं त्यांना ह्या गोष्टी कळविल्याबरो-

वर ते तुमचें म्हणणें काय आहे तें ऐकून घेऊन त्याचा प्रतिकार करतील असा आमचा समज होता. पण ही समजूत सुटायला गेल्या ५० वर्षांचें सरकारचें वर्तन कारण झालें आहे. कितीही तुम्ही ओरडा, कितीही चळवळ करा, कितीही कारणें दाखवा, त्यांच्या रिपोर्टांतले आंकडे त्यांचे पुढें मांडा, पण त्यांच्या दृष्टीला असा कांहीं विकार झाला आहे कीं तेच आंकडे त्यांना दिसत नाहींत. त्याच कोट्या, तींच कारणें त्यांना पटत नाहींत. आम्हीं जर एखादी गोष्ट सांगितली तर त्याच्या विरुद्ध जें कांहीं असेल तेवढेंच ते घेऊन बसतात.

तुम्हाला असें कदाचित् कोणी येऊन सांगेल कीं यांत कांहीं नवल नाहीं. तुमचें राज्य मुसलमानांचें असो किंवा हिंदूंचें असो, पेशवाई असो किंवा नगरच्या बादशहाचें असो, हीं राज्यें मोडून आतां इंग्रजांची सत्ता झाली आहे. अर्थात् ते लोक आपला फायदाच करतात, मग त्यांच्याबद्दल तुम्ही ओरडतां कां ? हें व्हावयाचेंच.असें कित्येकांचें म्हणणें आहे. तुमची ही ओरड ही मात्र उगीच सरकारला दुखविण्याकरितां, सरकारचें मन एक प्रकारें विकारवश करण्याकरितां कारण होतें; याकरतां ही ओरड कांहीं करूं नका. आणखी ते काय देतील तें मुकाट्यानें घ्या. चतकोर भाकर देतील तिचा आनंदानें स्वीकार करा आणि

त्यांचे आभार माना असें कित्येक लोकांचें म्हणणें आहे. मला कांहीं हें म्हणणें पसंत नाहीं.

माझें म्हणणें असें आहे कीं, सरकार जरी झालें–कोणतेंही कां असेना, इंग्लंडचें असो कोणतेंही असो; सरकार म्हणून सरकारला एक प्रकारचें कर्तव्य आहे. सरकारला एक प्रकारचा धर्म आहे. एक प्रकारची जबाबदारी त्यांचे अंगावर आहे. ती जेव्हां जबाबदारी सरकार टाळील तेव्हां तें सरकारच नव्हे असें मी म्हणतों. सरकारचा जो अधिकार आहे, सरकारची एकंदर लोकांवर जी कांहीं हुकमत आहे, मग ती त्यांनीं लढाई करून मिळविली असो किंवा लोकांनीं दिलेली असो, परंतु सरकारला कर्तव्य आहे. तुम्हा आम्हाला जसें कर्तव्य आहे तसें ज्यांना सरकार म्हणतात त्यांनाही कर्तव्य आहे. त्यांनीं अमुक कामें केलींच पाहिजेत. तुम्हांला सरकार जेव्हां चांगलें आहे असें कोणी प्रतिपादन करतात तेव्हां ते काय दाखवितात? या आमच्या सरकारानें सडका बांधल्या, आगगाड्या केल्या, तारायंत्रें केलीं, पोष्ट ऑफिसें केलीं ह्या तुमच्या सोई केल्या नाहींत का ? आणि तुम्ही कां सरकारच्या नांवानें ओरडतां ? असा नेहमीं प्रश्न विचारण्यांत येतो. या गोष्टी केल्या नाहींत असें माझें म्हणणें नाहीं; परंतु केल्या एवढ्या पुऱ्या नाहींत. ह्या गोष्टी केल्या आहेत, चांगल्या केल्या आहेत, पूर्वीच्या सरकारनें केल्या

असल्या त्यापेक्षां इंग्रज सरकारनें अधिक चांगल्या केल्या आहेत हें त्यांना भूषणावह आहे. पण ज्या गोष्टी सरकार करीत नाहीं, त्या गोष्टी आम्हीं सांगूं नयेत कीं काय ? परंतु ज्या केल्या नाहींत, ज्या करण्याची इच्छा अझून दिसून येत नाहीं त्यांची वाट काय ? पुष्कळ रीतीनें सांगितलें तरी त्या लोकांचें तिकडे लक्ष जात नाहीं.

इंग्रजी राष्ट्राची जी सत्ता आमच्या देशावर आहे ती सत्ता न बिघडतां, त्यांत कांहीं कमी न पडतां जर आपल्याला ही सत्ता कायम ठेवून कांहीं करतां आलें तर तें करा असें म्हणण्यांत कांहीं कोणत्याही प्रकारचा राजद्रोह होत नाहीं. इंग्रज लोकांची सत्ता जी आमच्यावर आहे ती पाहिजे आहे; पण हे मधें जे कोठावळे आहेत ते आम्हांला नको आहेत. धान्य यजमानाचें आहे. सामुग्री यजमानाची आहे; परंतु या कोठावळ्यांचें मधें जें पोट दुखतें तें तेवढें मधलें काढून टाका; आणि ते अधिकार लोकांना द्या. म्हणजे लोक आपआपल्या घरची रीतीप्रमाणें व्यवस्था पहातील. या प्रकारचें स्वराज्य आम्हीं मागतों.

स्वराज्य म्हणजे इंग्रज सरकार काढून टाका, बादशहाची सत्ता काढून टाका, आमच्या एखाद्या संस्थानाची सत्ता त्या ठिकाणीं घेऊन या असा स्वराज्याचा अर्थ नव्हे. स्वराज्याचा अर्थ असा आहे कीं, आम्हाला देवाचे पुजारी

काढून टाकावयाचे आहेत. देव ठेवावयाचे आहेत. हे पुजारी नकोत. दुसरे आमच्या पैकीं पुजारी नेमा असें आमचें म्हणणें आहे. हे जे मध्यें कलेक्टर, कमिशनर वगैरे लोक आलेले आहेत ते नको आहेत. हल्लीं तुमच्यावर सत्ता कोण चालवितो ? बादशहा येऊन ती चालवीत नाहीं. ते विलायतेंत आहेत. त्यांना कांहीं गोष्टी कळविल्या तर तुमचें कल्याण व्हावे अशी त्यांची इच्छा आहे असें दिसतें. मग तुमचें कल्याण कां होत नाही ?

स्वराज्य शब्दाचा अर्थ, वर आपले बादशहा कायम, इंग्रज लोकांची सत्ता कायम आणि बाकीची व्यवस्था करण्याचा अधिकार पूर्णपणें लोकांच्या ताब्यांत असणें हें स्वराज्याचें लक्षण आहे. आम्ही जें कांहीं मागतों तें कांहीं इंग्रज सरकारची सत्ता कमी करा, इंग्रज सरकार जाऊन या ठिकाणीं जर्मन सरकार यावें असें कांहीं मागत नाहीं. हल्लींच्या युद्धामुळें उलट झालें आहे आणि तें सर्व जगाच्या निदर्शनास आलें आहे. आपली राजनिष्ठा इंग्रजसरकारच्या ठिकाणीं असावी अशाबद्दलची आमची बुद्धि–आमचें रक्त सांडून–आम्हीं शाबीत केली आहे. यापेक्षां आपला कांहीं अधिक पुरावा कोणी मनुष्य देऊं शकेल असें मला वाटत नाहीं.

तेव्हां आज ही गोष्ट निःसंशय आहे कीं, या ठिकाणीं आम्हाला इंग्रजांचेंच राज्य पाहिजे आहे आणि त्या-

प्रमाणें आम्हीं प्रयत्न करीत आहों; मग अशी जर स्थिति आहे तर हे मधले जे लोक नेमिलेले आहेत त्या लोकांना काढून टाकून इंग्रजी साम्राज्यामध्यें इतर ठिकाणीं लोकांना जे हक्क आहेत ते आम्हांला कां मिळूं नयेत ? आम्हीं त्यांच्यापेक्षां शौर्यानें कमी नाहीं, विद्येनें कमी नाहीं, आमचे अंगीं कर्तृत्व आहे. इतकें असून हे हक्क आम्हांला कां मिळूं नयेत ? एक दोन माणसें नेमिल्यानें कांहीं आमचें समाधान व्हावयाचें नाहीं.

असो; ही पद्धत कोणीं काढली ? ती बादशहानें काढली नाहीं. राणीचा जो जाहीरनामा मागे प्रसिद्ध झाला आहे तो जाहीरनामा एकीकडे आणि हल्लींची पद्धत एकीकडे. हल्लीं आमच्या हातांत कांहीं आमचें कल्याण करावयाचें उरलें नाहीं. आम्हांला जर असें वाटलें कीं .अमूक एक परदेशी माल येतो त्याच्यावर जकात बसवून स्वदेशी मालाला उत्तेजन द्यावें तर ती गोष्ट आमच्या हातांतील नाहीं; आम्हांला वाटलें कीं, देशामध्यें अमूक उद्योगधंदे पाहिजे आहेत ते आम्ही सुरू करूं, बाहेर देशांतून पैसे देऊन शिक्षक आणवूं तर ही गोष्ट कांहीं आमच्या हातांतील नाहीं. किती थोडी गोष्ट आहे ! सर्व लोकांना लिहितां वाचतां यावयास पाहिजे. मुसलमान असो, कोणत्याही धर्माचा असो, कोणत्याही जातीचा असो, त्याला थोडेंबहुत लिहितां वाचतां

आलें पाहिजे. ही गोष्ट आतां सर्व पृथ्वीवरील सगळ्या लोकांना कबूल झाली आहे. याबद्दल आतां कांहीं शंका नाहीं. लिहितां वाचतां आल्यानें मनुष्याला कांहीं तरी फायदा होतो. हें कांहीं कोणाला नव्यानें सांगावयास नको.

मग आमच्याकडे ती गोष्ट कां होत नाहीं ? पैसा नाहीं म्हणून. ही सबब कोण सांगतो ? ही सबब अधिकारी वर्ग सांगतात. यांचा पगार २५०० असतो आणि तो ३००० करावयाचा असला तर पैसे आहेत. आज ५० वर्षें ह्या गोष्टी आपल्या नजरेस आल्या आहेत. १९०६ सालीं ज्या वेळेस कलकत्त्याला कांग्रेस भरली त्या वेळेस दादाभाई नौरोजी यांनीं पन्नास वर्षांचा आपला अनुभव सर्वांस सांगितला कीं ही जी कांहीं अव्यवस्था आहे, हा जो कांहीं एका प्रकारचा अन्याय हिंदुस्थान देशांत घडत आहे, याचा प्रतिकार होण्याला लोकांच्या हातांत सत्ता जाण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. आणि ही सत्ता जोंपर्यंत तुमच्या हातांत येणार नाहीं तोंपर्यंत तुमचा भाग्योदयही होणार नाहीं. बादशाहा कोणीही असो, त्याच्याबद्दल आमचें म्हणणें नाहीं. पण ज्या गोष्टी व्यवहारांतल्या, व्यापारांतल्या, धर्मांतल्या, समाजांतल्या आहेत त्या गोष्टी आम्हांला करावयाला पाहिजेत; त्या गोष्टी आम्ही करण्याची सत्ता आमच्या हातांत थोडीबहुत आल्याखेरीज-सर-

तेशेवटीं पूर्ण आली पाहिजे–पूर्णपणें आमच्या ताब्यांत आल्याखेरीज आम्हाला कोणत्याही प्रकारें सुवत्तेचा, भाग्योदयाचा, फायद्याचा किंवा उत्कर्षाचा काल येणें अशक्य आहे. लोकांच्या तोंडानें कांहीं पाणी पितां येत नाहीं. तें आपणच प्यावें लागतें.

तुम्हांला हे हक्क कांहीं तरवार घेऊन मिळवावे म्हणून कोणी सांगत नाहीं. पण आज राष्ट्राची बुद्धि पालटली आहे, हिंदुस्थानाकडून इंग्लंडला कांहीं मदत होऊं शकते. हिंदुस्थान सुखी असलें तर इंग्लंडलाही एक प्रकारचें वैभव, एक प्रकारची शक्ती, आणि एक प्रकारें मोठेपणा येणार आहे. ही बुद्धि इंग्लंडात जागृत झालेली आहे या जागृत झालेल्या बुद्धीचा जर या वेळीं फायदा घेतला नाहीं तर अशी संधी कांहीं पुन्हा यावयाची नाहीं.

या अधिकारी वर्गाला ही गोष्ट वाईट वाटते. यांत कोणाचें नुकसान आहे? बादशहाचें नाहीं, तर या अधिकारी वर्गाचें आहे. तेव्हां त्यांना ही गोष्ट वाईट वाटते. आणि ते हल्लीं असा उपदेश करीत आहेत कीं तुम्ही स्वराज्याला पात्र नाहीं; म्हणून आम्ही येथें आलों आहों;– जसे काय हे ज्या वेळीं हिंदुस्थानांत नव्हते त्या वेळीं हिंदुस्थानांत कोठेहि स्वराज्य नव्हतें. सगळे आम्ही रानटी आणि एकमेकांचे गळे कापण्याला प्रवृत्त झालों होतों. पेशवाईंत

राज्यव्यवस्था नव्हती, मुसल्मानांत राज्यव्यवस्था नव्हती, आम्हाला कांहीं राज्यकारभार पाहतां येत नव्हता, आम्हाला रस्ते करतां येत नव्हते, लोक सुखी कसे रहावे हें आम्हाला कळत नव्हतें, नाना फडनवीस मूर्ख होता, मलीकंबर मूर्ख होता, अकबर, औरंगजेब मूर्ख होते म्हणून येथें हे आमच्या कल्याणाकरितां आले आहेत, आणि तुम्ही अजून पोरं आहांत.

पोरें आहांत हेंहि घटकाभर कबूल केलें. आतां तुम्ही मोठे तरी कधीं होणार आहा? कायद्यामध्यें २१ वर्षांचा झाला म्हणजे मोठा समजतात. यांनीं ५० वर्षें आमच्यावर राज्य केलें तरी आम्हाला मोठें होतां आलें नाहीं. तेव्हां यांनीं ५० वर्षें केलें काय? जर हिंदुस्थानचे लोक पोरें होते तर त्यांना शहाणे करण्याचें काम कोणाचें होतें? यांचें काम होतें. राज्यकर्ते हे होते. माझें तर असें म्हणणें आहे कीं हें काम यांनीं केलें नाहीं—तेव्हां आम्ही पोरें आहों इतकेंच नव्हे—तर हे राज्य करण्याला नालायक आहेत. ज्या लोकांना ५० वर्षांत आपली प्रजा सुधारतां आली नाहीं त्यांनीं आपला अधिकार सोडून दुसऱ्याच्या ताब्यांत द्यावा हेंच चांगलें. लोक जें आपल्याला असें सांगत आहेत कीं तुम्ही पात्र झालेला नाहीं तें अपमतलबीपणाचें आहे. हें सांगणें खरें असलें तर त्यांची एक प्रकारे नालस्ती आहे, ते अयोग्य ठरत आहेत; आणि खोटें असलें तर

आपमतलबीपणाचें आहे. याशिवाय दुसरें आपल्याला त्यापासून कोणत्याही तऱ्हेनें अनुमान करतां येत नाहीं. आम्हीं नालायक म्हणजे आहे काय? झालें काय आम्हाला? म्युनिसिपालिटीची व्यवस्था केलेली चालते, कोणी विलायतेहून पास होऊन आला आणि कलेक्टर झाला तर चालतो. ते कामें करितात, सरकार त्यांची शिफारस करितें. आणि स्वराज्याचे हक्क ज्या वेळीं लोकांना द्यावयाचे, त्या वेळीं तुम्ही नालायक आहां असें स्पष्टपणें सगळ्या लोकांनां-कोट्यावधि लोकांना नालायकीचें सर्टिफिकीट देणें म्हणजे आपल्या नालायखीचे प्रदर्शन करण्यासारखें आहे.

आक्षेप स्वराज्यावर घेतले जातात. पहिली गोष्ट मीं सांगितलीच कीं ते एकदम सगळ्या राष्ट्राला नालायक ठरवितात. परीक्षा घ्या म्हटलें तर परीक्षाही घ्यावयाची नाहीं. नालायक नालायक म्हणजे काय? अशा तऱ्हेची आज हल्लीं लटपटपंची चाललेली आहे. ती चालूं न देतां पूर्ण नेटानें तुम्ही मागावयाला तयार आहां किंवा नाहीं हे मला विचारावयाचें आहे. तुम्ही जर मागावयाला तयार नाहीं, तुम्ही जर याबद्दल आग्रह धरिला नाहीं, आजची संधी तुम्हीं फुकट दवडली, तर अशी संधी पुन्हा १०० वर्षांत यावयाची नाहीं. तेव्हां तुम्हीं तयार असलें पाहिजे. मला ठाऊक आहे की तयार होऊन जर अम्मळ जोरानें बोललों तर

एखादा पोलीसचा शिपाई ए म्हणेल, नाहीं असें नाहीं, परंतु तें सोसलें पाहिजे. जर तुम्ही निश्चयानें, एकीनें सर्व जातीचे लोक, सर्व धर्मांचे लोक एकत्र होऊन जर या वेळीं ही मागणी सरकाराकडे मागाल, आग्रह धराल, याकरितां जो कांहीं खर्च करावा लागेल तो करावयाला तयार व्हाल, ती मागणी आपल्याला मिळाल्याखेरीज आपली तृप्ति व्हावयाची नाहीं, संतोष रहावयाचा नाहीं, असें सरकारलाच नव्हे तर सर्व जगाला जाहीर कराल, इतका नेट जर तुमच्या अंगांत असेल तर माझी खात्री आहे कीं, परमेश्वर कृपेनें ही मागणी लवकरच तुम्हांला मिळाल्याखेरीज राहावयाची नाहीं.

तुमच्या निश्चयाचें फळ आहे. धर्मामधें काय, किंवा राजकारणामधें काय, निश्चय पाहिजे, आणि तो मनाचा निश्चय हिंम्या केल्याखेरीज येत नाहीं. कसें होईल म्हणून चालावयाचें नाहीं. बरें होवो वाईट होवो, हीच गोष्ट आम्हाला पाहिजे, हीच आम्ही मागणार, याकरितां आम्हीं पैसे गोळा करून, खर्च लागेल तो, श्रम लागतील ते करणार आणि ही आमची मागणी पुरी होई तोंपर्यंत आम्ही हीं चळवळ बंद करणार नाहीं; आमच्या हयातींत हे काम पुरें झालें नाहीं तर आमचीं पोरेंबाळें पण हीच चळवळ कायम ठेवतील अशी जेव्हां निष्ठा या कामावर असेल त्याच वेळीं फळ मिळत असतें. निष्ठेखेरीज परमेश्वराकडे फळ मिळत

नाहीं, राजाकडे मिळत नाहीं, इहलोकीं नाहीं, परलोकीं नाहीं. ही निष्ठा जर तुमच्यांत नसेल तर अशा तऱ्हेनें प्रयत्न जारीनें करून तरी त्यापासून कांहीं फळप्राप्ती व्हावयाची नाहीं. निष्ठा प्रथम पाहिजे. आपल्याला ज्या गोष्टी खऱ्या वाटतात, त्या गोष्टी प्रतिपादन करण्याला, त्या सांगावयाला, लोकांना सांगावयाला, कळविण्याला, अधिकाऱ्यांना सांगावयाला, किंबहुना बादशाहासहि सांगावयास आम्ही तयार पाहिजे. लोकांच्या हातांत बादशहानें अधिकार दिले पाहिजेत. आणि हिंदी प्रजेमध्यें व इंग्रजी प्रजेमध्यें, गोऱ्या आणि काळ्या प्रजेमध्यें कोणत्याही प्रकारचा भेद न ठेवतां ती जशी बादशहाची प्रजा तशीच आम्हीही प्रजा आहों. ते जितके सुखी आहेत, तितकें आम्हांलाही सुख झालें पाहिजे. या सगळ्यांची किल्ली म्हणून जी हल्लीं कांहीं लोकांनीं, शहाण्या, विद्वान्, विचारी पुरुषांनीं जी गोष्ट ठरविली आहे ती स्वराज्य होय. त्याची वेळ आज आली आहे.

# व्याख्यान ३ रें.

ता. १।६।१९१६ रोजीं अहमदनगर येथें झालेलें व्याख्यान.

साधारणतः माझें मत असें आहे कीं, आम्हांला ज्या कांहीं सुधारणा पाहिजे आहेत, त्या स्वराज्याच्या सुधारणा होत. आपल्याला माहित असेल " वृद्ध जरती न्याय ". तो असा आहे कीं, एका म्हातारीच्या बाईला देवता प्रसन्न झाल्यानंतर तिनें काय मागावयाचें याचा विचार केला, आणि असें सांगितलें कीं, देवतेपासून असा वर मागितला कीं, माझे नातू सोन्याच्या ताटांत जेवतील असें मीं प्रत्यक्ष पाहीन, असा वर देवतेनें मला द्यावा; म्हणजे तिनें तोंपर्यंत हयात राहावें, मुलगा व्हावा, त्यानें संपत्ति मिळवावी वगैरे वगैरे—या एका लहानशा वरामध्यें सगळा अर्थ एका ठिकाणीं येतो; तद्वतच स्वराज्याची गोष्ट आहे.

स्वराज्य जर मिळालें नाहीं तर औद्योगिक उन्नति व्हावयाची नाहीं, स्वराज्य मिळालें नाहीं तर कोणत्याही प्रकारचें प्राथमिक शिक्षण असो, वरिष्ठ शिक्षण असो, राष्ट्राला उपयुक्त असें शिक्षण मिळणें शक्य नाहीं.-स्वराज्य जर मिळालें नाहीं तर नुसतें स्त्रीशिक्षणही वाढवून चालावयाचें नाहीं. औद्योगिक सुधारणा होऊन चालावयाचें नाहीं; सामाजिक

सुधारणा होऊन चालावयाचें नाहीं. ही सगळीं स्वराज्याची अंगें आहेत. सत्ता आधीं, आणि ज्या ठिकाणीं सत्ता त्या ठिकाणीं शहाणपण; शहाणपण सत्तेला सोडून नसतें; असेल तर तें विफळ होतें. कोणत्याही राष्ट्रामध्यें हा सिद्धांत कांहीं विशेष विशद करून सांगावा लागत नाहीं. पण आमच्या लोकांना हा विशेष रीतीनें समजावून द्यावा लागतो.

स्त्रीशिक्षण नको असें मी म्हणत नाहीं, पण ही इकडची चळवळ बंद करण्याकरितां तिकडे वळा असें जेव्हां आम्हांला सांगतात त्यावेळीं आमचें असें म्हणणें आहे कीं, राष्ट्र मृत करण्याचा हा उपाय आहे. तुमच्या अंगांत जर कुवत नसेल, तुमच्या अंगांत एखादी गोष्ट प्राप्त करून घेण्याची धमक नसेल,तर शिकलेली बायको घेऊन तिच्या पोटीं जें संतान होईल तेंहि तसेंच होईल आणि ते आमचे पुत्र उतराई व्हावे म्हणून कांहीं खटपट करतील असें म्हणणें अगदीं मूर्खपणाचें आहे. तुम्हांला आपल्या पायावर उभें राहिलें पाहिजे. तुम्हांला या गोष्टी घडवून आणल्या पाहिजेत, आणि त्यांतील-मुख्य गोष्ट ती प्रथमतः घडवून आणिली पाहिजे. ज्यांनीं आज ५० वर्षे प्रयत्न केले त्यांचा असा अनुभव आहे कीं, स्वराज्य ही सगळ्यांची किल्ली आहे. आणि ही जर तुमच्या हातांत आली नाहीं तर किरकोळ प्रयत्न करून मग ही सुधारणा आम्ही करितों हें म्हणणें व्यर्थ.

स्वराज्य म्हणजे काय ? हें काल सांगितलें. स्वराज्य म्हणजे इंग्रजांना घालवून द्यावयाला नको. राजा कोणी असला तरी चालेल. राजाशीं आम्हांला कांहीं करावयाचें नाहीं. आमचे हक्क आम्हांला मिळाले म्हणजे झालें. आणि तो राजा कोणीही वर असून ते हक्क मिळूं शकतात. इंग्लंडांत राजा आहे, परंतु इंग्रज लोकांना हक्क आहेत किंवा नाहींत ? इंग्लंडचा राजा, तोच आमचा बादशहा; मग इंग्लंडांत त्याचें राजेपण कायम राहून जर इंग्रज लोकांना स्वातंत्र्याचे हक्क मिळतात, तर हिंदुस्थानांत तोच राजा बादशहा म्हणून कायम राहून ब्रिटिश नागरिकत्वाचे हक्क आम्हांला मिळण्याला अडचण कोणती ? कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, खायाला तर देतात कीं नाहीं ? कोणाला मारीत नाहींत; पशुपक्ष्यांना सुद्धां खायाला मिळतें; खायाला मिळणें हा कांहीं पुरुषार्थ नाहीं. कुटुंबाचें उदरपोषण करणें हा कांहीं पुरुषार्थ नाहीं. "काकोपि जीवति चिराय बलिं च भुंक्ते" कावळा आपला उदरनिर्वाह करितो. त्यांना कांहीं शेतें पिकवावीं लागत नाहींत. रोज त्यांना शिजविलेला भात खायाला मिळतो. उदरनिर्वाह करून पोट भरून राजानें लावून दिलेल्या मर्यादेच्या आंत, त्यांनीं मोकळ्या ठेवलेल्या जेवढ्या जागा असतील तेवढ्या स्वीकारून त्यांचे हुकूम मानणें, त्यांच्या तंत्रानें उदरनिर्वाह करणें, यांत

कांहीं मी पुरुषार्थ समजत नाहीं. पशूंचा आणि मनुष्यांचा हा समान धर्म आहे. मनुष्यामध्यें जर कांहीं मनुष्यपणा पाहिजे तर आमची बुद्धि, आमची कर्तबगारी, आमची एकंदर हिम्मत, हिय्या यांना कांहीं तरी प्रदेश मोकळा पाहिजे कीं नाहीं ? हिंदुस्थानाला तसा प्रदेश मोकळा नाहीं. याकरितां तुम्हांला जर कांहीं कर्तव्य असेल तर पहिलें कर्तव्य हें कीं, या सत्तेपैकीं कांहीं अंश आपल्या ताब्यांत घ्या. अशा प्रकारची उमेद जर बाळगिली नाहीं तर उत्तरोत्तर सृष्टिनियमाप्रमाणें अशी जी कांहीं मनुष्यामध्यें उमेद किंवा बुद्धि असते ती कमी कमी होत जाईल; त्या मानानें अधिक अधिक पशूंच्या समानतेला येत जाऊं.

स्वराज्य म्हणजे काय ? आणि त्यानें होणार काय ? स्वराज्य म्हणजे काय ? एक कलेक्टर काढला आणि तुमचा आला असेंच केवळ नव्हे. ते आले तरी पाहिजे आहेत. अमुक मनुष्य काढा, अमुक ठिकाणीं अमुक व्यवस्था ठेवाव्या, असें सांगण्यास कांहीं हरकत नाहीं. कदाचित् गोरा मनुष्य पगार देऊन आमचाही नोकर होईल, चांगला असला तर आम्हीं ठेवूंही, व्यक्तीचा वादच नाहीं, राष्ट्राचा वाद आहे. सत्ता हातीं असल्याखेरीज दुसरा कांहीं मार्ग नाहीं. ती सत्ता ज्यावेळीं एकदां आपल्या हातांत येईल त्यावेळीं आपल्याला हजारों गोष्टी करितां येतील: पुण्याला एवढा मोठा प्रयत्न

झाला कीं; घोड्याला एक दारूचें दुकान, एक हजार दोन हजार प्राप्तीचें असेल सरकाराला—परंतु तें उठविण्याचें आमच्या ताब्यांत नाहीं; अमुक ठिकाणीं दारूचें दुकान घाला किंवा घालूं नका, याला इतकें correspondence कशाला ? ह्या एवढ्या खटाटोपाला, मला वाटतें कीं, जितके कागद लागले असतील तितका दुकानाला वर्षाचा नफा नसेल. हा जो खटाटोप हल्लींच्या व्यवस्थेंत चालतो तो बंद व्हावा, ही अरेरावी बंद व्हावी, आणि ती सत्ता आमचे ताब्यांत यावी.

सत्ता आमच्या ताब्यांत आल्यानें आमचें अंगांत असलेल्या वडिलोपार्जित गुणांचा उत्कर्ष होईल. ते गुण कोणत्याही तऱ्हेनें उपयोगांत आणावयाला आम्हांला वाट सांपडेल. स्वराज्य, स्वराज्य म्हणजे दुसरें कांहीं नाहीं. थोडें कां असेनां ? पण तें नाहीं हे तुम्हाला जाचत नाहीं ? जितकें जाचावें तितकें जाचत नाहीं. घरामध्यें बसला, कांहीं तरी धंदा केला, दोन पैसे मिळविले, मुलाबाळांचें पोट भरलें, हें इतकें पुरतें आहे. आतां स्वराज्याची खटपट कशाला ? याचें उत्तर एवढेंच आहे कीं, जी एक राष्ट्राबद्दलची बुद्धि आपल्यापेक्षां कांहीं तरी अधिक या जगामध्यें आहे, आपल्या एका व्यक्तीपेक्षां अधिक व्यक्तींच्या समुदायाचा फायदा करण्याचें जें एक अधिक कर्तव्य आहे, तें कर्तव्य तुम्हीं विसरता

चाललां. एके वेळ अशी होती कीं, महाराष्ट्राच्या मालिकेंत या मुलखांत असे कर्ते पुरुष होते कीं, ज्यांना ध्येयांची जागृती होती. परंतु दैवयोगानें हा मनुष्यस्वभाव राहिला नाहीं. आमचें काम जर दुसरा करूं लागला तर आम्ही म्हणतों बरें झालें, काम झालें म्हणजे झालें. पण कोठें बरें म्हणावयाचें आणि कोठें नाहीं याचा विवेक मात्र आमच्यां-तून नाहींसा झाला आहे.

ज्याप्रमाणें पोपटाला पिंजऱ्यांत ठेवितात त्याप्रमाणें तुमची स्थिति झाली आहे. एक गोष्ट केसरीमध्यें प्रसिद्ध झाली होती. पिंजऱ्यांत ठेवल्याबद्दलची अशी एक कविता रविंद्रनाथ टागोर यांनीं आपल्या आत्मचरि-त्रांत लिहिली आहे. पिंजऱ्यांत ठेवलेला एक पोपट आणि बाहेरचा एक पोपट या दोघांचा संवाद त्यांत सर्व सांगित-लेला आहे. बाहेरच्या पोपटांनीं पिंजऱ्यांतील पोपटाला सांगितलें कीं, बाहेर अशी मजा आहे, इतकें हिंडावयाला मिळतें, वाटेल तेथें जायाला मिळतें, वाटेल त्यावेळीं खायाला मिळतें, हा आनंद तुला कोठें आहे ? पिंजऱ्यांत ठेवलेल्या पोपटानें उत्तर दिलें कीं, बाबा तूं म्हणतोस तें खरें आहे; परंतु ही सोन्याची काठी बाहेर गेल्यावर कोठें मिळणार आहे ? तशी आमची अवस्था झाली आहे ! स्वराज्य मिळालें तर चालविणार कसें ? कोणी, देत नाहीं घेत नाहीं तुम्हांला

काळजी पडली आहे स्वराज्य मिळालें तर आम्हीं चालविणार कसें ! आम्हीं योग्य नाहीं ! त्या पोपटाला तो बाहेर गेला तर पिंजरा व बसावयाला काठी वगैरे कशी मिळणार ? तशीच आमची अवस्था झाली आहे. ही अवस्था स्वाभाविक नव्हे, ती कृत्रीम आहे. त्या पोपटाला जसें पुष्कळ वर्षे पिंजऱ्यांत कोंडल्यामुळें त्याला अशी भावना उत्पन्न झाली, तसेच हे अधिकार आमच्या हातांतून गेल्यामुळें आम्हांलाही ती भावना उत्पन्न झाली; ही आमची मूळची स्वाभाविक—मनुष्यांची स्वाभाविक—भावना नाहीं. जशी पोपटाची ती स्वाभाविक भावना नव्हे, तशीच आमच्या राष्ट्राची ही स्वाभाविक भावना नव्हे; हें पहिल्यानें लक्षांत घेतलें पाहिजे.

जें अंगावर काम पडेल तें करावयाला आम्हीं तयार होतों. याप्रमाणें जे लोक तयार होते, त्यांचे वंशज आम्ही आहोंत; आणि त्यांचें जर आपण खरे वंशज असाल तर आम्हांला ती संधी आली असतांना त्यांचे गुण आमचें अंगांत प्रगट झाले पाहिजेत, आणि होतील अशा भरंवशानें त्याकरितां आपण उद्योग केले पाहिजेत असें माझें म्हणणें आहे. अनुवंशिक संस्काराला जर कांहीं किंमत असेल तर द्या, नाहीं तर अमक्याचे नातू पणतू हें तरी म्हणावयाचें सोडून द्या. हल्लीं आमचेकडे पुष्कळ सरदार आहेत. ते म्हणतात आमचे आजे सरदार होते. त्यांच्या अंगांतही

त्यांच्या रक्ताचे गुण आलेले आहेत; परंतु त्यांनीं जें वतन मिळविलें आहे तें बचावण्याकरितां तें साहेबांची कोणत्याही प्रकारें, वाटेल त्या प्रकारें, सेवा करतात. बरें, मी म्हणतों हे सरदार म्हणून असें करूं लागले; परंतु तुम्ही आम्ही ज्यांना कांहीं मिळावयाचें नाहीं त्यांनीं तरी त्यांच्या नादीं कां लागावें?

अशा तऱ्हेची जी राष्ट्रावर एक प्रकारची छाया पडली आहे, त्या छायेंतून आपल्याला सुटावयाचें आहे; हें ग्रहण आहे. चंद्राला ग्रहण लागलें म्हणजे तें सुटण्याकरितां दानें करितात. तुम्हाला जें ग्रहण लागलें आहे, तें सुटण्याकरितां एक पैही खर्च करावयाला तुम्ही तयार नाहीं; किंवा त्याकरितां हलायला तयार नाहीं. चंद्राला ग्रहण लागलें म्हणजे पूर्वीचे ब्राह्मण जप तरी करीत होते; तुम्ही कांहीं जप तरी करितां आहां का? या करितां खटपट करीत आहां का? याकरितां कोणाला दोन पैसे द्यायाला तयार आहां का? तुम्हीं अगदीं दुसऱ्याचें ऐकतां कामा नये; तुमचें जें काय तें आहे आम्हांला पाहिजे असें निश्चयानें तुम्ही म्हणावयाला तयार झालें पाहिजे. जोंपर्यंत तुमच्या मनांत निश्चय नाहीं, तोंपर्यंत कोणी पोलिसचा अंमलदार आल्याबरोबर "कां टिळकांच्या व्याख्यानाला गेला होतास काय?" "हो मागून गेलों होतों, लांब

बसलों होतों, मला सगळें ऐकूं आलें नाहीं." पोलीस अंमलदारांनीं पाहिलेलें असतें; नाहीं म्हणतां येत नाहीं. अशा तऱ्हेची तुमच्या मनामध्यें भीति कां? आम्हांला स्वराज्य पाहिजे आहे, असें म्हणण्यांत काय भीति आहे?

लटपटपंचीनें कोणतीही देवता प्रसन्न होत नाहीं. त्या देवतेला तुमच्या मनांत काय आहे तें कळत असतें; आणि या सगळ्या ज्या कळणाऱ्या देवता आहेत त्यांत स्वतंत्रता देवीचा या विषयावर मोठा कटाक्ष आहे. तुम्हांला पाहिजे तें मागा आणि ते देतील; कदाचित् एक दोनदां नाहीं म्हणतील; कितीदां नाहीं म्हणणार? हें अशा लटपटपंचीचें काम नाहीं इतकी खात्री झाली पाहिजे; यत्न झाल्याखेरीज गत्यंतरच नाहीं, अशी त्यांची खात्री झाली पाहिजे. तुमच्यांत कांहीं तरी दिसेपर्यंत भीति दाखवावयाची, हें प्रत्येक देवतेचें काम आहे. आमच्या योगशास्त्रामध्यें पाहतां देवतासाधन करण्यास पाहिजे. त्या भीति दाखवावयाला लागतात; साधलें म्हणजे बरेंच झालें आपण भीतीला न जुमानतां आपण आपलें काम निश्चयानें केलें तर योगशास्त्रांतील देवता आपल्याला प्रसन्न होतात; हें प्रमेय आहे, हा न्याय आहे. राजकीय बाबतींतही दुसरा न्याय नाहीं, मार्ग नाहीं आम्हांला तें पाहिजे आहे तें ( स्वराज्य ) प्राप्त करून घेणार आणि तें मिळाल्याखेरीज आम्ही आपले उद्योग सोड

णार नाहीं, अशी दृढ भावना तुमच्यामध्यें असल्याखेरीज ही गोष्ट कांहीं प्राप्त व्हावयाची नाहीं. हें भय मागें राहील, पोलीस मागें राहील, सी. आय्. डी., कलेक्टर मागें राहील, अखेर ती गोष्ट प्राप्त होईल; त्यांच्या डुरकावणीला तुम्हीं रडतां कामा नये. किंबहुना असें समजलें पाहिजे कीं, हा याचा एक निश्चित परिणाम आहे. इंग्रजीमध्यें अशी एक म्हण आहे कीं, अंधारांतून गेल्याखेरीज उजेड दिसणार कसा ? सूर्याला सकाळीं उगवावयाला अंधारांतून जावें लागतें. सामान्य लोकांची समजूत सागतों, शास्त्राची समजूत सांगत नाहीं. अंधारांतून गेल्याखेरीज उजेडाची प्राप्ती होत नाहीं; या झळीतून जाचणुकींतून आणि लोकांच्या डुरकावणींतून बाहेर पडल्याखेरीज स्वतंत्रतेची प्राप्ती नाहीं. निश्चय पाहिजे आहे. स्वराज्य म्हणजे काय हें मी आपल्याला सांगितलें.

माझे मित्र केळकर यांनीं सांगितलेंच आहे कीं, स्वराज्य म्हणजे इंग्रज लोकांना घालवून आपली सत्ता त्या ठिकाणीं स्थापित करावयाची नाहीं. राजाला घालवून राज्यसत्ता हातांत घेणें नव्हें; तर प्रजेचे हक्क हातांत घेणें होय; इंग्लंडला या एका राष्ट्राला गुलाम ठेवण्यापासून कांहीं फायदा आहे काय ? याचा जर नीट विचार केला तर आज एकंदर जगाच्या स्थितीवरून असें दिसून

येतें कीं, केव्हांना केव्हां तरी इंग्लंडला आपल्या हातांतील साम्राज्याचें अवयव जे प्रांत व देश आहेत, त्या देशांना स्वतंत्रता देणें जरूर पडेल. केव्हां तरी ही गोष्ट घडावयाची आहे, घडली पाहिजे; पण तुम्हीं जर कांहींच केलें नाहीं तर मात्र घडावयाची नाहीं. सगळी रात्र जागून चोर ज्यावेळीं आला त्यावेळीं निजलेले, तशी तुमची स्थिति होईल ! वेळ येते आहे; परमेश्वराच्या कृपेनें जगाच्या—इतर राष्ट्रांच्या—घडामोडीचें स्वरूप कदाचित् तुम्हांला अनुकूल होईल; पण हा काळ अनुकूल झाला. तुम्हीं जागे असाल तर उपयोग; नाहीं तर निजलांत म्हणजे निजला !

१८५८ सालीं हिंदुस्थानसरकारचा जो आक्ट झाला, तो आक्ट झाल्यापासून यंदा ५८ वर्षें झालीं. या ५८ वर्षांत काय झालें ? अधिकारी प्रबळ झाले, सत्ताधारी झाले, लोकांची सत्ता कमी झाली, ती येथपर्यंत कीं, कुळकर्णी आम्हांला नको, नोकर पाहिजेत सगळे; कोणाचे आपले अधिकार जन्मतः पिढीजाद असले तेही गेले. इनाम कमीशन आलें त्या वेळीं लक्षांत आलें नाहीं त्याला कांहीं इलाज नाहीं. विंचूरकर त्या वेळीं जाहागीरदार होते, सैन्याचे मालक होते. कोणी १०००० तर कोणी १५ हजार सेनेचा अधिकारी होता. त्यांना सांगितलें कीं तुम्हांला १५ हजार सैन्य पुरवावयाचे आणि तुम्हाला १५ लाख रुपये

द्यावयाचें, यामुळें तुम्हाला खर्च येतो १४ लाख. मग एक लाख रुपये घ्या. कबूल केलें. त्यांना घरीं बसून खायला मिळतें. मग काय ? हें मोठें तत्व आहे. त्या वेळीं असें कोणींही म्हटलें नाहीं कीं आमचा सैन्य ठेवण्याचा, सरकाराकरितां लढण्याचा अधिकार गेला असें कांहीं कोणाला वाटलें नाहीं. चांगलें आहे सरकार, घरीं बसून खायाला देतें, आणखी पाहिजे आहे काय ? या स्थितीमुळें आमची अशी अवस्था झाली आहे.

५० । ६० वर्षांमध्यें या प्रांताचे संगळे अधिकार युरोपिअन अधिकारी वर्गाच्या ताब्यांत गेले आहेत. यावरून असें समजूं नका कीं मी युरोपिअन अधिकारी वर्ग वाईट म्हणतों; ते फार मोठे शिकलेले आहेत. विलायतेंतून उत्तम विद्यार्थी जे येतात, त्यांना या जागा मिळतात; त्यांची कर्तृत्वशक्ति अधिक असते. पण इतकें सगळें जरी कबूल केलें तरी त्यांना आपल्याकरितां काम करितांना मोठी झीज लागते; विलायतची हवा थंड आणि इकडची ऊष्ण हवा म्हणून त्यांना पगार अधिक द्यावा लागतो. आपल्या कल्याणाकरितां आलेले, त्यांना नाहीं म्हणून म्हणणार तुम्ही ? ह्या सगळ्या गोष्टी आम्हांला कबूल आहेत. ते कदाचित् आमच्यापेक्षां कांकणभर जास्त काम करीत असतील हेंही मी नाकबूल करीत नाहीं. माझें म्हणणें इतकेंच आहे कीं, तें

काम आम्ही करावयाला तयार असतां तें काम आमचें असतांना लोकाकडे का ?

पुणें आणि सातारा या प्रांतांतील लोक जाऊन बडोद्याचा राज्यकारभार जर चालवितात तर तोच राज्यकारभार त्याच प्रकारें या आमच्या प्रांतांत चालविण्याला त्यांना हरकत कोणती ? राष्ट्राचे दोन विभाग होऊन एक भाग मराठी राष्ट्र कांहीं एका ऐतिहासिक कारणामुळें इंग्रज सरकारच्या ताब्यांत गेला, एक राहिला संस्थानिकांच्या ताब्यांत. या राष्ट्रांतील माणसें काम करण्याला लायक आहेत, असे एक भाग सांगतो. दुसऱ्या भागांत ते नालायक आहेत असें अधिकारी म्हणतात. आणि आम्हींही त्यांचा शब्द झेलून आम्हींही त्यांसारखें वेड्याप्रमाणें म्हणावयाला लागतों.

आतां आम्हांला पिढीजाद संस्थानिक मात्र चालावयाचा नाहीं. आम्हांला आम्हीं निवडलेला कोणी तरी एक अध्यक्ष निवडावा लागेल. एवढ्या फरकानें जी व्यवस्था नेटिव्ह संस्थानांचीं आहे ती जो प्रांत मराठ्यांची राजधानी होती त्या प्रांताला ती संस्था व्यवस्था द्यावयाची नाहीं, आणि जे प्रांत या प्रांतावर अवलंबून होते त्या प्रांतांना ती मिळावी, हें केवळ एक ऐतिहासिक कोडें किंवा विसंगतता आहे. त्याला कांहीं कारण नाहीं. आम्हीं कां तसें होऊं नये ? मी आपल्याला सांगितलें कीं, गायकवाड, शिंदे सरकार यांनी

पैसे आणि फौजा लढाईला युरोपांत पाठविल्या आहेत. आमच्या ताब्यांत असती तर आम्हांही तेंच केलें असतें; ब्रिटिश राज्य जाणें किंवा ब्रिटिश राज्य राहणें या गोष्टीशीं याचा कांहीं एक संबंध नाहीं. परंतु अधिकारी वर्गाची, परकी अधिकारी वर्गाची सत्ता राहणें, न राहणें एवढा भेद आहे.

हा व्यवस्थेंत भेद आहे. मूळ जी साम्राज्याची सत्ता, तिच्यामध्यें भेद नाहीं. मला वाटतें कीं पूर्वीं लॉरेन्स साहेबांनीं असें सुचविलें होतें कीं,-ही जी स्वराज्याची चळवळ चालली आहे—त्यांचें असें म्हणणें होतें कीं, हिंदुस्थान तोडून निरनिराळीं संस्थानें काढून द्या. तेथें कांहीं तज्ञ ठेवून परराष्ट्राशीं तह करणें, इंग्रजी राज्यसत्तेला धोका येणार नाहीं अशा प्रकारची लष्कराची किंवा आरमाराची व्यवस्था करणें इत्यादि जे अधिकार तेवढे मात्र आपल्या ताब्यांत ठेवा, ते अधिकार तुम्ही ताब्यांत ठेवूं नका, असें म्हणत नाहीं. स्वराज्याचे व्यवस्थेंत हे वरचे साम्राज्य सरकारमधले प्रश्न आहेत. हिंदुस्थानचे इतर राष्ट्रांशीं संबंध कोणत्या प्रकारचे असावे, अमक्याबद्दल लढाई करावी कीं न करावी आणि ज्यावेळीं परराष्ट्राशीं संबंध येईल, त्यावेळीं कोणतें धोरण स्वीकारावें हें इंग्लंडानें खुशाल आपल्या ताब्यांत ठेवावें. स्वराज्य मागणारे लोक त्यांत ढवळाढवळ करूं इच्छित नाहींत. आम्हांला जें काय पाहिजे आहे

तें हें कीं, आज जशी नेटिव्ह संस्थानांमध्यें आम्हीं आपली व्यवस्था करतों; त्याच प्रकारें ही व्यवस्था आमच्याकडे करावयाला आम्हांला अधिकार पाहिजे आहे. आमचें जें कांहीं कराचें उत्पन्न येतें तें अमुक बाबतींमध्यें खर्च करूं, शिक्षणाकडे खर्च करूं, दारूपासून कमी उत्पन्न झालें तर त्याच्या मोबदला दुसरे कोणते कर बसवावे, तें आम्हीं ठरवूं आणि त्याप्रमाणें आम्हीं व्यवस्था ठेवूं; व्यापाराची व्यवस्था ठेवूं, सगळ्या गोष्टींची आम्हीं व्यवस्था ठेवूं, तुम्हीं त्यांत हात घालूं नये. हें मीच आपल्याला सांगतों असें नाहीं. हें लॉरेन्स साहेबांनीं म्हटलें आहे. जर हिंदुस्थानांत पुढें सुधारणा करावयाची असेल, लढाईनंतर जर कांहीं एक प्रकारें यांची व्यवस्था लावावयाचा सरकारचा हेतु असेल तर सर्व हिंदुस्थानचे निरनिराळे प्रांत करा; त्यांच्या डोक्यांत कांहीं भाषेची कल्पना नव्हती; परंतु आम्ही ती आणखी घालतों; मराठी प्रांतांचें,तेलंगी प्रांतांचें, कानडी प्रांतांचे असें एक एक संस्थान करा.

हिंदुस्थान हा मोठा देश आहे. भाषावार त्याची वाटणी करा. पाहिजे तर मराठीचा भाग निराळा काढा, गुजराथीचा निराळा काढा, पण हिंदु-मुसलमान त्यांत कसे शिकवावयाचे यांच्याबद्दलही मी बोलणार आहें. कानडामध्यें फ्रेंच आणि इंग्रज लोकांची वस्ती आहे, तेथें

इंग्रज मुत्सद्याला तें ठरवितां आलें तर मुसलमान आणि हिंदु यांनीं कसें चालावें हें कां त्यांना ठरवितां यावयाचें नाहीं ? हल्लीं या गोष्टी न देण्याच्या बाबतींत या सबबी आहेत. कांहीं हातांत न देतांना कोणत्याही प्रकारची सत्ता आपल्या ताब्यांत नसतांना, शितें टाकून झुंजवायची गोष्ट आहे. तशां-तला हा प्रकार आहे. यापासून पुढें कांहीं हक्क मिळतील, सत्ता ताब्यांत येईल, त्याचीही पायरी आहे, म्हणून जर आम्हांला दिलें असेल तर त्याची किंमत आहे. नाहीं तर त्याची कांहीं किंमत नाहीं. होतें काय ? चांगल्या सुशिक्षित लोकांना २ । ४ घटका झुंजवावयाचें कसें याची ही विद्या आहे. यासाठीं स्वराज्यानें होणार काय ? मागतों आहों काय ? हें लक्षांत आणा.

स्वराज्यानें आम्हीं असें मागतों आहों कीं, सर्व हिंदुस्थानभर अशा प्रकारचीं अखेर संस्थानें होऊन त्या संस्थानांत पहिल्यानें विलायतेहून आलेलां इंग्रज माणसें, अखेरीस लोकांनीं निवडलेले अध्यक्ष राहून सर्व राष्ट्र-संबंधानें जे कांहीं प्रश्न आहेत याचें निराळें कौंसिल ठेवावें; युरोप, अमेरिका, युनायटेड स्टेटसमध्यें जशी व्यवस्था आहे त्याचीं निरनिराळीं लहान संस्थानें होऊन त्यांचें एकीकरण करण्याला त्या ठिकाणीं जसें कॉंग्रेस आहे, त्याच प्रकारचे अधिकार इंपीरिअल कौन्सिलचे

अधिकार हिंदुस्थानसरकारनें आपले ताब्यांत ठेवावें. आणि हल्लीं जं निरनिराळें ७।८ प्रांत आहे, त्यापेक्षां पाहिजे तर आठाचे वीस प्रांत करा. आणि लोकांना ज्याप्रमाणें सुलभ पडेल अशा तऱ्हेनें त्यांना पसंत होईल, त्यांच्या हातांत सत्ता राहील, अशा तऱ्हेनें या प्रांताची व्यवस्था लावा; हेंच स्वराज्याचें मागणें आहे. स्वराज्याचें मागणें म्हणजे बादशहाला काढा असें नाहीं. कदाचित् या व्यवस्थेकरितां कांहीं कांहीं ठिकाणीं इंग्रजी अंमलदार तुम्हाला आणावे लागतील. कबूल आहे गोष्ट. पण ते अंमलदार आमचे राहतील, लोकांचे राहतील, लोकांचे नोकर म्हणून राहतील, ते आपले धनी म्हणून राहणार नाहींत. जी कांहीं आतां हिंदुस्थानची सुधारणा म्हणून करावयाची ती सुधारणा घडवून आणण्याला केवळ आमच्याकडच्या लोकांची बुद्धी पुरी पडणार नाहीं.आम्हांला इंग्लंडांतून अमेरिकें-तून लोक आणावे लागतील, पण ते लोक आम्हाला जबाबदार राहतील, बेजबाबदार राहणार नाहींत. तेव्हां एका दृष्टीनें विचार केला तर युरोपिअन लोकांच्या विरुद्ध ही चळवळ आहे असें कांहीं म्हणतां येत नाहीं.

कृतीला हिंदुस्थानांत थोडा थोडा आरंभ झाला आहे. मद्रासेस बीझांटबाईनीं होमरूल लीग काढली आहे; येथेंही आम्ही काढली आहे; आणि याच प्रमाणें बंगाल्यांत किंवा

इतर ठिकाणीं लवकर होमरूल लीग निघेल. कदाचित् कॉंग्रेस हा प्रश्न हातीं घेऊन तेच स्वतः लीग काढतील तर बाकीच्या लीग तिच्यामध्यें मिसळून जातील. उद्योग एकच करावयाचा. हा उद्योग आणि तुम्ही करणारे आहां. फायद्याचा प्रश्न आहे.स्वराज्य आम्हाला मिळवावयाचें आहे तें कोणत्या प्रकारचें मिळावयाचें हे सांगितलें. त्यानें हल्लीच्या स्थितींत पुढें काय फरक पडेल, तें सांगितलें. लॉर्डांच्या सभेला अशीं स्वप्नें पडायाला लागलीं आहेत. लॉर्ड हार्डीज-साहेब यांनीं सिव्हिलीयन लोकांना सांगितलें कीं, थोड्या काळांत तुमचे अधिकार तुमच्या हातांतून तुम्हाला लोकांना द्यावे लागणार.आपल्या विरुद्ध पक्षाचे जे लोक आहेत त्यांना या कामांत वाईट स्वप्नें पडावयाला लागलीं आहेत. आणि तुम्ही मात्र नालायकः—आम्ही नाहीं घेणार हें. हा कोठचा आग्रह ? याची उपपत्ती काय ? तर त्यांना अशीं स्वप्नें पडूं लागलीं आहेत. या तऱ्हेची कांहीं तरी व्यवस्था करावी लागणार असे त्यांच्या बुद्धीनें घेतले आहे. तुम्हाला उद्योग करावयाचा तो एक करावयाचा. पहिल्यानें सर्व देशभर चळवळ करून प्रत्येक मनुष्याची अशी खात्री करून दिली पाहिजे कीं, हेंच आमचें ध्येय आहे. याकरितां आम्ही खट-पट करण्याची आहे. एवढेंच नव्हे तर कांहीं तरी व्यवस्था आम्हाला पाहिजे, ही मागणी कायम केली पाहिजे.

विलायतेत जाऊन लोकांची तशी खात्री केली पाहिजे. आणि पार्लमेंट सभेंत ज्या वेळीं या विषयाचा वादविवाद होईल, त्या वेळीं त्या सभेपुढें आपला हा हेतु योग्य तऱ्हेनें मांडला पाहिजे.

याबद्दल मतभेद राहतां कामा नये. नेमस्त आणि राष्ट्रीय यांचें एकच ध्येय, एकच मागणी मांडून एकच मिळविण्याचें आहे. अशी भावना ठेवून जो हा उद्योग करावयाचा त्याकरितां होम रूल लीग म्हणून निराळी संस्था काढली आहे. कॉंग्रेसपुढें हा विषय मांडला गेला आहे. परंतु कॉंग्रेसही वर्षांतून एकदा मिळणारी असल्यामुळें एकदांची संधी गेली, म्हणजे दुसरे वर्षी. परंतु वर्षभर हा उद्योग आम्हाला करावयाला पाहिजे आहे. हे कॉंग्रेसला कबूल झालें आहे, अशा बुद्धीनें ही लीग आम्हीं काढली आहे. तुह्मी आपला उद्योग काय करावयाचा, याला काय मदत करावयाची ही गोष्ट लक्षांत आणा. कदाचित् पोलीसचा त्रास होईल मागें, नाहीं असें नाहीं. वर्गणीदार झाला कां ? मेंबर झाला कां ? होय, झालों म्हणून सांगावयाला पाहिजे, दुसरें या कामीं खटला झाला तर यांतील वकील पैसे न घेतां चालवितील. एक रुपाया या कामाला दिला, हा राजद्रोह नाहीं. याचें मेंबर होणें हा कांहीं राजद्रोह नाहीं. यापेक्षां ( १ रुपया देण्यापेक्षां आणि मेंबर

होण्यापेक्षां ) तुम्हाला कांहीं करावयाचें नाहीं, बाकी काम करण्याचा बोजा ही लीग आपल्या अंगावर घेत आहे; तर अशा वेळीं महाराष्ट्रांतील लोकांनीं गप्प बसावें ? कोणीही असो; मुसलमान, हिंदु, मारवाडी असो, सगळे आम्हाला पाहिजे आहेत, नको असें कोणी नाहीं; यांत जातीभेद, धर्माचा भेद नाहीं. यांत हे हिंदुस्थानाकरितां काम करावयाचें आहे, मागें जसें एक ठिकाणीं मीं सांगितलें कीं, तुमच्या व्यापारामध्यें असें आहे कीं, एक आणा आपल्या नफ्यापैकीं गोरक्षणाकरितां ठेवितात. अशी एक संवय आहे. तुम्हाला मी असें विचारतों कीं इकडे सुद्धां एक आण्यांपैकीं एक पैसा, अर्धा पैसा आम्हाला व्यापारी लोकांनीं कां देऊं नये ? हिंदुस्थान ही मोठी गौ आहे, लहानसहान गौ नाहीं, त्या गौनें तुम्हाला जन्म दिला आहे, त्या गौच्या उद्योगावर तिच्या फलद्रूपतेवर, तिचें दूध पिऊन तुम्ही आपला उदर-निर्वाह करीत आहां.

गौचे जे पुत्र आहेत ते जर काळजी करणार नाहींत. तर गोपुत्रांना बैल म्हणतात, तसें तुम्हाला म्हणावें लागेल. साधारण गोपुत्रांना जें लोकामध्यें नांव आहे तें म्हणावें लागेल. येवढ्या मी आपल्याला गोष्टी सांगितल्या, ही संस्था निर्माण झाली आहे, उद्योग सुरू झाला आहे, तिच्यावर संकटें आलां, तर तीं आम्ही सोसायाला तयार आहों, तीं

सोसलींच पाहिजेत; स्वस्थ बसून सगळ्यांचा निर्वाह लागावयाचा नाहीं, या साठीं अशा तऱ्हेनें मदत करा, याप्रमाणें कार्याला मदत करा, मग ईश्वर तुम्हांला सोडणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. ईश्वराच्या कृपेनें या गोष्टी साध्य झाल्या पाहिजेत, आम्ही मात्र उद्योग केला पाहिजे. फार जुनें तत्व असें आहे कीं, God helps those who help themselves हें ऋग्वेदांतील तत्व आहे, ईश्वर अवतार घेतो केव्हां ? तुम्ही जेव्हां त्याच्याकडे गाऱ्हाणीं नेऊन देवाची प्रार्थना कराल तेव्हां. फुकट अवतार ईश्वर घेत नाहीं. आळशी लोकांकरितां ईश्वर अवतार घेत नाहीं, उद्योगी लोकांकरितां ईश्वर अवतार घेतो, म्हणून उद्योगाला लागा.

स्वराज्य-संघ कचेरी.

४८६ नारायण पेठ, पुणें.

'होमरूल-लीग'च्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां बेळगांव येथें ता. २८ एप्रिल १९१६ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां 'होम-रूल-लीग' कमिटीची सभा भरली होती. सभेस पुढील गृहस्थ हजर होते:—

(१) रा. ग. श्री. खापर्डे, (२) रा. बा. गं. टिळक, (३) मि. जोसेफ बॅपटिस्टा, (४) डॉ. बा. सि. मुंजे, (५) रा. मा. श्री. अणे, (६) रा. र. पां. करंदीकर, (७) रा. ग. ब. फणसळकर, (८) रा. स. खं. आळतेकर, (९) डॉ. चंदुलाल म. देसाई (१०) ना. द. व्यं. बेळवी. (११) रा. न. चिं. केळकर.

रा. खापर्डे यांना सभेचे अध्यक्ष निवडल्यावर बरीच चर्चा होऊन सर्वांनुमतें पुढील ठराव पसार करण्यांत आले.

(१) 'इंडियन होम-रूल-लीग' (हिंदी-स्वराज्य-संघ) या नांवानें एक संघ स्थापन करण्यांत यावा. (२) ब्रिटिश साम्राज्यांतर्गत 'होम-रूल' अथवा 'स्वराज्य' हिंदुस्थानाकरितां सनदशीर मार्गानें मिळविणें व 'होम-रूल' मिळविण्याकरितां राष्ट्रांत लोकमत शिक्षित व तयार करणें, हे या संघाचे उद्देश आहेत. (३) संघाचे अधिकारी तूर्त पुढीलप्रमाणें नेमण्यांत आले आहेत:— अध्यक्ष:-बॅ. जोसेफ बॅपटिस्टा; चिटणीस:-रा. न. चिं. केळकर

मदत चिटणीसः—रा. दा. वि. गोखले (४) वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणाही पुरुषास अगर स्त्रीस संघाचे वरील उद्देश मान्य असल्यास व ते तसे मान्य आहेत अशाबद्दल लेखी मान्यता दिल्यास संघाचे सभासद होतां येते. वार्षिक वर्गणी कमींत कमी रु. १ आहे. (५) संघाचे उद्देशाप्रमाणें काम पुढें चालविण्याकरितां खालील गृहस्थांची एक कमिटी नेमण्यांत आली आहेः—

**(१) डॉ. वि. रा. पटवर्धन** (पुणें.) **(२) रा. रा. ग. श्री. खापर्डे** (उमरावती.) **(३) रा. रा. बा. गं. टिळक** (पुणें.) **(४) बॅरिस्टर जोसेफ बॅपटिस्टा** (मुंबई.) **(५) रा. ब. चिं. वि. वैद्य** (कल्याण.) **(६) रा. रा. र. पां. करंदीकर** (सातारा.) **(७) ना. द. व्यं. बेळवी** (बेळगांव.) **(८) डॉ. बा. सी. मुंजे** (नागपूर.) **(९) रा. मा. श्री. अणे** (यवतमाळ.) **(१०) रा. रा. एस्. के. आळतेकर** (कराड.) **(११) रा. रा. ग. व. फणसळकर** (सातारा.) **(१२) डॉ. चं. म. देसाई** (मुंबई.) **(१३) डॉ. दि. धों. साठे** (मुंबई.) **(१४) डॉ. रा. गो. वझे** (पुणें.) **(१५) रा. रा. ना. रं. आळेकर** (नागपूर.) **(१६) रा. रा. वि. रा. लेले** (सोलापूर.) **(१७) रा. रा. न. चिं. केळकर** (पुणें.)

# हिंदी स्वराज्य--संघ.

## ( मान्यता )

मी खाली सही करणार ______________________

______________________________________

ह्या लेखानें असें कळवितों कीं मी ' स्वराज्य-संघा ' चे उद्देश वाचले आहेत व ते मला मान्य आहेत. संघाचा सभासद होण्याची माझी इच्छा आहे व. मी या लेखाबरोबर रु. ______________ वार्षिक वर्गणी म्हणून देत आहें.

सही ______________________________

पूर्ण नांव ______________________________

हुद्दा ______________________________

धंदा ______________________________

पत्ता ______________________________

REFBK-0001398

Printed by S. N. Joshi, at Chitra Shala Press
Poona City and Publihed by N. C. Kelkar,
Secratary Home Rule League, 486,
Narayan Peth Poona City,

# ...ज्यप्राप्त्यर्थ

## हिंदुस्थानानें केलेल्या प्रयत्नांचा इतिहास

मिसेस आनी बिझांट यांच्या " How India wrought for freedom " या प्रसिद्ध ग्रंथाचें माजी 'विहारी' कर्ते रा. रा. **रामचंद्र नारायण मंडलिक** बी. ए. यांनीं चार भागांत भाषांतर करण्यास प्रारंभ केला असून पहिला भाग विक्रीस तयार आहे. यांत पहिल्या पांच कॉंग्रेसपर्यंतची हकीकत चित्तवेधक व बोधपर रीतीनें दिली आहे. किं. १ रु. कायम ग्राहकांस चवथा भाग अर्ध्या किंमतीस मिळेल. पुस्तकें मुंबईस ग्रंथकर्त्यांकडे किंवा पुढील पत्त्यावर मागवावीं.

**म्यानेजर**

**धी प्रिंटिंग एजन्सी, पुणे शहर**

लोकमान्य

# टिळकांवरील जमानतीचा खटला

रा. रा. दा. वि. गोखले बी. ए. एल्एल्. बी. यांनी अस्सल कागदपत्रांवरून या खटल्याच्या इंग्रजी व मराठी प्रती तयार केल्या आहेत. यांत लोकमान्यांचीं स्वराज्या-वरील तिन्ही भाषणें, खालच्या व वरच्या दोन्ही कोर्टांतील सर्व हकीकत, वर्तमानपत्रकर्त्यांचे दोन्ही निकालांवरील अभिप्राय व इंग्रजीस रा. रा. केळकर यांची व मराठीस रा. रा. दादासाहेब करंदीकर यांची अनुक्रमें " टिळक आणि राजद्रोहाचा कायदा " व " टिळकांवरील खटल्याचें सिंहावलोकन " याविषयीं विस्तृत प्रस्तावना, ९ प्रमुख व्यक्तींचे फोटो वगैरे विषय आहेत. पृ. सं. २०० असून मराठी प्रतीची किंमत ८८ व इंग्रजी प्रतीची ८१२. ट. ख. निराळा.


**धी प्रिंटिंग एजन्सी**

प्रिंटर्स, बुकसेलर्स अँड पब्लिशर्स

**पुणे शहर.**